सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २०८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १७ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## प्रत्येक दुकानावर बोर्ड असायला हवा, 'गर्व से कहो, यह स्वदेशी है'

### वाढदिवसानिमित्त पंतप्रधान मोदींचं आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ धार मध्यप्रदेश**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सणउत्सवांपूर्वीच पुन्हा एकदा देशवासीयांना स्वदेशी वापरण्याचा आग्रह केला. यावेळी स्वदेशी वापराचा देशाला काय फायदा होईल? यासंदर्भातही त्यांनी भाष्य केले. एवढेत नाही तर, प्रत्येक दुकानावर 'गर्व से कहो, यह स्वदेशी है',असे बोर्ड लागायला हवेत, असेही ते म्हणाले. ते आपल्या वाढदिवसाच्या दिवशी म्हणजे आज मध्य प्रदेशातील धार येथे एका कार्यक्रमात बोलत होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले, हा सणउत्सवांचा काळ आहे. आपण स्वदेशीचा मंत्र सातत्याने उच्चारायला हवा. तो तुमच्या जीवनाचा भाग व्हायला हवा. मी करबद्ध विनंती करतो की, तुम्ही जे काही खरेदी कराल, ते भारतात बनलेले असावे. तुम्ही जे काही खरेदी करता त्यासाठी कुण्यातरी भारतीयांचा घाम लागलेला असावा. तुम्ही जे काही खरेदी कराल,त्याला भारतीय मातीचा सुगंध असावा. मी व्यापाऱ्यांना देशासाठी मला पाठिंबा देण्याचे आवाहन करतो. मला तुमच्या मदतीची आवश्यकता आहे कारण मला २०२७ पर्यंत विकसित भारत



निर्माण करायचा आहे आणि त्याकडे जाण्यारा मार्ग आत्मनिर्भर भारतातून जातो.

दरम्यान पंतप्रधान मोदी यांनी स्वदेशी खरेदीचे काही फायदेही सांगितले. ते म्हणाले, जेव्हा आपण स्वदेशी वस्तूंची खरेदी करतो, तेव्हा आपला पैसा आपल्याच देशात राहतो. तो परदेशात जात नाही. तोच पैसा पुन्हा देशाच्या विकासात कामी येतो. याच पैशांपासून रस्ते तायार होतात. गावांत शाळा तयार होतात, तसेच हाच पैसा गरीब कल्याणच्या योजना राबवताना कामी येतो. मध्यम वर्गाच्या स्वप्नपूर्तीसाठी मोठ्या प्रमाणावर धनाची आवश्यककता असते. हे सर्व आपण अगदी छोट्या छोट्या गोष्टीतून साध्य करू शकतो. जेव्हा आपल्याला आवश्यक असलेल्या वस्तू आपल्याच देशात तयार होतात, तेव्हा रोजगार निर्मिती होते.

मोदी पुढे म्हणाले, आता २२ सप्टेंबर रोजी, नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून, नवे जीएसटी दर लागू होणार आहेत. तेव्हा आपण केवळ स्वदेशी उत्पादनेच खरेदी करायला हवीत. आपण एक मंत्र लक्षात ठेवायला हवा. तो प्रत्येक दुकानावर लिहिलेला असायला हवा, अशी माझी इच्छा आहे. मी राज्य सरकारला एक मोहीम सुरू करण्याचा आग्रह करेन, प्रत्येक दुकानावर एक बोर्ड असावा – गर्वसे कहो, यह स्वदेशी है.

## मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर लाल रंग फेकला

### पोलिसांच्या आठ पथकांकडून आरोपीचा शोध सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

शिवाजी पार्क परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. अज्ञात व्यक्तीने मीनाताई बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्यावर लाल रंग फेकल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनंतर शिवसैनिकांनी पुतळ्याची साफसफाई केली आहे. पोलिस सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने आरोपीचा शोध घेत आहेत. सध्या परिसरात खबरदारी म्हणून पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



वातावरण दूषित करण्यासाठी कोणीतरी हे कृत्य केल्याचा आरोप शिवसैनिकांनी केला आहे. या घटनेमागे एखादा समाजकंटक आहे की माथेफिरू आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे. आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी शिवसैनिकांनी केली आहे.मीनाताई ठाकरे यांच्या शिवाजी पार्कसमोरील पुतळ्यावर रंग टाकण्यात आल्याचा प्रकार आज सकाळच्या सुमारास उघडकीस आला होता. याप्रकरणी उद्धव ठाकरे यांनी पुतळास्थळी भेट देऊन पाहणी करून घटनेचा आढावा घेतला आहे.

स्वर्गीय मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर लाल रंग टाकण्याचा प्रयत्न झाल्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे तत्काळ घटनास्थळी पोहोचलेत. तिथे त्यांनी नेमकी काय व कशी घटना घडली व आतापर्यंत पोलिसांनी काय कारवाई केली? याचा आढावा घेतला. शिवाय आरोपीला २४ तासांत अटक करावी, असा अल्टिमेटम त्यांनी पोलिसांना दिला.

## दिल्ली-मुंबई हल्ल्यात मसूद अजहरचा हात; जैश कमांडर इलियासचा आणखी एक कबुलीजबाब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७लाहोर**

पाकिस्तानमधीलदहशतवादाबाबत एक मोठा खुलासा झाला आहे. जैश-ए-मोहम्मदचा कमांडर मसूद इलियास काश्मिरी याने जाहिरपणे कबूल केले की, दिल्ली आणि मुंबई हल्ल्यांमागे जैश प्रमुख मसूद अझहरचा हात होता. यावेळी त्याने पाकिस्तानातील बालाकोट आणि बहावलपूरमधील जैशच्या ठिकाणांचाही उल्लेख केला आणि सांगितले की, याच ठिकाणांहून दहशतवादी हल्ल्यांच्या योजना आखण्यात आल्या.



दहशतवादी इलियास काश्मिरीने त्याच्या कबुलीजबाबात पाकिस्तानी सरकारचा खरा चेहरा जगासमोर आणला. त्याने खुलासा केला की, बहावलपूरमधील जैश कॅम्पमध्ये मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांच्या अंत्यसंस्कारात सहभागी होण्याचे आदेश थेट पाकिस्तानी लष्करप्रमुखाने दिले होते. याशिवाय, यांनी बहावलपूर आणि जैश-ए-मोहम्मद यांच्यातील दुवे लपवण्याचा प्रयत्न केला होता, असा दावाही करण्यात आला आहे.

**ऑपरेशन 'सिंदूर'नंतर दहशतवाद्यांमध्ये भीती**

कमांडरच्या कबुलीजबाबातून आणखी एक मोठा मुद्दा समोर आला आहे. ऑपरेशन 'सिंदूर' नंतर दहशतवादी गटांमध्ये मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण आहे. कश्मिरीने सार्वजनिक व्यासपीठावरून 'मिशन-ए-मुस्तफा' साठी विविध दहशतवादी संघटनांनी एकत्र यावे, असे आवाहन केले. काहींनी जिहाद नाकारला आहे, पण मी उरलेल्यांना घेऊन पुन्हा जिहाद जिवंत ठेवणार आहे, अशी घोषणा त्याने केली.

**मसूद अझहरच्या कुटुंबाचे तुकडे झाले**

याशिवाय, ऑपरेशन सिंदूर अंतर्गत बहावलपूरमध्ये भारताने केलेल्या स्ट्राईक दरम्यान दहशतवादी मसूद अझहरच्या कुटुंबाचे 'तुकडे-तुकडे' झाले, अशी माहितीही इलियास काश्मिरीने दिली आहे. यावेळी त्याने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांचा उल्लेख करत म्हटले की, अल-जिहादची आवाज नेतन्याहूपर्यंत पोहोचली पाहिजे. त्याचबरोबर लोकांनी जिहाद जिवंत ठेवण्यासाठी हात वर करून नारे द्यावेत, असे आवाहनही त्याने केले.

## मोदी हाच जगातील सर्वात मोठा ब्रँड; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### भाजप कार्यकर्त्यांचा ब्रँड निर्माण करून देणारा पक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हा ब्रँड होता. पण, तुमचा ब्रँड नाही. भाजप हा कार्यकर्त्यांचा ब्रँड निर्माण करून देणारा पक्ष आहे. चहा विकणारा जगात जागतिक ब्रँड झाला. नरेंद्र मोदी नावाचा जगातील सर्वांत मोठा ब्रँड आमच्याकडे आहे, असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंना मंगळवारी लगावला. काहीही झाले तरी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत महायुतीचाच भगवा झेंडा फडकवून महायुतीचाच महापौर होणार, असा विश्वासही व्यक्त करीत




त्यांनी महापालिका निवडणुकीचे रणशिंग फुंकले.

मुंबई भाजप प्रदेशच्या वतीने मुंबईत वरळी येथील डोम सभागृहात विजयी संकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, विधान परिषदेचे गटनेते आ. प्रवीण दरेकर यांच्यासह मुंबईतील आमदार, माजी मुंबई प्रदेश अध्यक्ष, माजी आमदार यावेळी उपस्थित होते.

**सामान्य व्यक्ती मुंबईचा महापौर होणार**

मुंबईच्या महानगरपालिकेमधील भ्रष्टाचाराला बाहेर काढणारी भाजपची सामान्य व्यक्ती महापौर होणार आहे. ज्या कोविड काळात सामान्यांना बेड मिळत नव्हते, ऑक्सिजन मिळत नव्हता त्याच काळात महापालिकेतील सत्ताधाऱ्यांनी हजारो कोटींचा भ्रष्टाचार केला. निवडणूक आल्यावर हे कफनचोर कोणत्या तोंडाने मते मागायला जाणार आहेत, असा सवाल फडणवीस यांनी केला. उद्धव ठाकरे यांची १०० भाषणे काढून मुंबईच्या विकासाबद्दल बोलले असतील तर १०० रुपये द्यायला तयार आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

**दहा लाख लोकांना धारावीतच घर**

मुंबईने अनेक राज्यांना, देशाला, जगाला भरभरून दिले आहे. ते आता मुंबईला परत करण्याची वेळ आली असून, भाजप महायुतीचे सरकार पालिकेच्या माध्यमातून केल्याशिवाय राहणार नाही. बीडीडी चाळींसारखाच धारावीचा विकास करुन १० लाख लोकांना तिथेच घरे देणार. मुंबईच्या विकासासाठी सरकार प्रयत्न करीत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या चिंतन शिबिराचे नागपूरमध्ये आयोजन - आ. संजय खोडके

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार गट) तर्फे राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी नागपूरमध्ये शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५ रोजी 'राष्ट्रवादी चिंतन शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. अमरावती विभागीय समन्वयक आमदार संजय खोडके यांनी ही माहिती दिली.

नागपूर येथील 'द एम्पायर हॉटेल'मध्ये होणाऱ्या या शिबिरात युवक, महिला, शेतकरी, कामगार, शिक्षण, रोजगार, महिला सुरक्षा, आत्मनिर्भरता, व संघटनात्मक बळकटीकरण यासारख्या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.या शिबिरात उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष



अजितदादा पवार, खा. प्रफुल्ल पटेल, खा. सुनील तटकरे, ना. छगन भुजबळ व इतर वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.शिव-शाहू-फुले-आंबेडकर व यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांवर आधारित सामाजिक बांधिलकी आणि प्रगतीचे धोरण या शिबिरात निश्चित करण्यात येणार आहे. शिबिरात केवळ ३००-४०० निवडक पदाधिकारी - आमदार, खासदार, जिल्हाध्यक्ष आणि नेते सहभागी होणार आहेत.या चिंतन शिबिराच्या माध्यमातून पक्षाची आगामी कार्ययोजना ठरवण्यात येणार असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरही हे शिबिर महत्त्वाचे ठरणार आहे, असेही आमदार संजय खोडके यांनी सांगितले.

## नगरपरिषदा, नगरपंचायतींसाठी प्रत्येकी १ कोटींचा निधी, एकनाथ शिंदेंची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज वाढदिवस आहे. या दिवसाचं औचित्य साधून राज्यातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये वैशिष्ट्यपूर्ण व नविन नगरपंचायत,नगरपालिका योजने अंतर्गत एक उद्यान विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करतानाच या उद्यानांना 'नमो उद्यान' नाव देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे केली.

या निर्णयामुळे राज्यातील एकूण ३९४ नगरपरिषद आणि नगरपंचायतींमध्ये नमो उद्यान वर्षभरात विकसित करण्यात येतील. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्राने दिलेली ही भेट असल्याचे




उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

नव्याने विकसित झालेल्या या उद्यानांची विभागीय स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. त्यामाध्यमातून प्रत्येक विभागातून ३ नगरपरिषद/नगरपंचायतींना बक्षिसे देखील देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री शिंदे यांनी जाहीर केला आहे.

नमो उद्यानांच्या स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे पारितोषीक संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना जाहिर करण्यात येतील. त्यामध्ये प्रथम क्रमांकासाठी पाच कोटी, द्वितीय तीन तर तृतीय क्रमांकासाठी एक कोटी रुपये अशी बक्षिसाची रक्कम अतिरिक्त विकास निधी म्हणून विजेत्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींना देण्यात येणार आहे.

## शरद पवार हे महाराष्ट्रातील कट कारस्थानाचा कारखाना, त्यांच्यावर...

### गोपीचंद पडळकरांची बोचरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मुंबई**

शरद पवार हे महाराष्ट्रातील कटकारस्थानाचा कारखाना आहे. कारस्थाने कशी रचायची याचा मुख्य कारखाना पवार आहेत. तुम्ही निवडणूक आयोगावर शंका निर्माण करण्याचं पाप करतायेत. ज्या मारकडवाडी गावात तुम्ही फेरमतदान घेण्याची मागणी केली त्या गावातील सरपंच आज समोर येऊन हे पवारांनी केलेले कारस्थान होतं असं सांगत असल्याचं म्हणत भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांनी शरद पवारांवर जोरदार निशाणा साधला.

आमदार गोपीचंद पडळकरांनी आज पत्रकार परिषद घेतली. त्यात ते म्हणाले की, लोकशाहीत निवडणुका अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असते. ज्यावर लोकांचा प्रचंड विश्वास आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर निवडणूक आयोग, ईव्हीएम मशिनवर विरोधकांनी खापर फोडले. लोकसभेला महायुतीला अपयश आले, परंतु कोणावर टीका टिप्पणी न करता महायुतीच्या नेत्यांनी आपलं कुठे चुकलंय हे लक्षात ठेवून चुका दुरुस्त केल्या. विधानसभा निवडणुकीत मविआ



नेते हवेत होते. लोकसभेप्रमाणेच विधानसभेला मतदान होईल या भ्रमात होते. लोकसभेला लागलेला निकाल जनतेचा कौल आहे असं ते बोलत होते. मात्र विधानसभेत पराभव झाल्यानंतर ईव्हीएमवर बोलू लागले असं त्यांनी म्हटलं. शरद पवार आधुनिक काळातील नारदमुनी आहेत. ते भांडणे लावतात, वाद काढतात. एका बाजूला मंडल यात्रा काढतात दुसऱ्या बाजूला लेक आणि नातू मराठा समाजाला आरक्षण द्या असं म्हणतात. एकाचवेळी दुतोंडी भूमिका कशी घ्यायची हे त्यांच्याकडून शिकावे. निवडणुकीत २ माणसे भेटायला आले, त्यांचा प्लॅन समजून घेतला. त्या लोकांना घेऊन राहुल गांधींना जाऊन भेटले. १६० आमदार निवडून आणू देऊ शकतात. हे सगळे ७-८ महिन्यांनी सांगतायेत. पोलिसांना काहीच सांगितले नाही. त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करायला हवा अशी मागणीही गोपीचंद पडळकर यांनी केली.

## संपादकीय ......

# नवयुगाचा प्रेरणास्तंभ - आधुनिक 'नरेंद्र'

*स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील राजकारण व सत्ताकारण काँग्रेसच्या अवतीभोवतीच फिरत राहिले. जनता पक्ष, राष्ट्रीय आघाडी, संयुक्त आघाडी असे विविध प्रयोग झाले. वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकारही या देशाने पाहिले; पण वाजपेयी यांच्या सहा वर्षांच्या राजवटीनंतर पुन्हा काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीएचे सरकार केंद्रात स्थानापन्न झाले. वाजपेयी यांचे पहिले सरकार होते १३ दिवसांचे, तर दुसरे १३ महिन्यांचे. तिसरे मात्र होते सलग पाच वर्षांचे. ते सरकारही जवळपास २४ पक्षांच्या आधारावर उभे होते. शिवाय वाजपेयी हे अनेक वर्षे दिल्लीतील संसदीय राजकारणात वावरत होते; पण २०१३ मध्ये नरेंद्र मोदी यांची भाजपच्या पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून निवड झाल्यानंतर मोदी यांनी संपूर्ण देश पिंजून काढला आणि भाजपला ३१ टक्के मते व २८२ जागा मिळवून देण्याचा पराक्रम केला.*

*वाजपेयींपेक्षा मोदी यांनी अधिक यश मिळवले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपची मते ३७ टक्क्यांवर गेली आणि भाजपला ३०३ जागा मिळाल्या. २०२४ च्या निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपने विजयाची हॅट्ट्रिक केली. भारताच्या काँग्रेसकेंद्रित राजकारणाचा ढाचा संपूर्णपणे बदलण्याचे कर्तृत्व हे निःसंशय मोदी यांचेच. काँग्रेसच्या धर्मनिरपेक्ष राजकारणाला छेद देत मोदी यांनी 'सब का साथ, सब का विकास और सब का विश्वास' या आधारे राजकारण केले. नेहरूंनंतर देशातील कोणताही पंतप्रधान सलगपणे तिसऱ्यांदा त्या पदावर आलेला नाही.*

*राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी दि. ११ मे १९५१ रोजी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या सोहळ्यास उपस्थिती लावली होती. राष्ट्रपतींनी धार्मिक सोहळ्यास हजेरी लावू नये, ही नेहरूंची सूचना त्यांनी अव्हेरली होती. वास्तविक भारत हा हिंदुबहुल देश असून, हिंदूंच्या महत्त्वाच्या धार्मिक सोहळ्यास सरकारमधील उच्च पदस्थांनी हजेरी लावण्यात कोणतीही गैरबाब नसल्याची भूमिका घेताना धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली बहुसंख्यांच्या धार्मिक भावनांना प्राधान्य देण्याचे मोदी यांनी ठरवले. त्यामुळेच अयोध्येतील राम मंदिराच्या पुनर्निर्माणाचे काम अग्रक्रमाने त्यांनी हाती घेतले. या सोहळ्यास उपस्थित राहून सर्व पूजाविधी पार पाडले. वाराणसी येथे काशी विश्वनाथ मंदिर परिसराचे स्वरूप त्यांनी पालटून टाकले. वाराणसीमधूनच जगद्गुरू शंकराचार्यांनी देशाला एकतेच्या धाग्याने बांधण्याचा संकल्प केला.*

*तुलसीदासांनी 'रामचरितमानस' या अलौकिक रचनेची निर्मितीही तेथूनच केली होती. मोदी यांनी वाराणसी मतदारसंघ जाणीवपूर्वक निवडला. हिंदू धर्माप्रमाणेच जैन, बौद्ध, शीख, ख्रिश्चन आणि इस्लाम या सर्व धर्मांचा आदर करण्याचे सर्वसमावेशक धोरण स्वीकारले. सर्वांना समान वागणूक आणि कोणाचेही लांगूलचालन नाही, हे त्यांचे तत्त्वज्ञान. पंतप्रधान म्हणून अकरा वर्षांच्या कार्यकाळात आर्थिक संरचनात्मक सुधारणा त्यांनी आणल्या. सत्तेवर येताच नियोजन मंडळ मोडीत काढून, त्याऐवजी नीती आयोगाची स्थापना त्यांनी केली. त्यामार्फत राज्यांना अधिक प्रमाणात साधनसंपत्तीचे वाटप करण्याची नीती आखली. देशातील १२०० कालबाह्य कायदे रद्द करून, उद्योजकांना मोकळा श्वास घेता येईल, अशी व्यवस्था केली.नोटाबंदीसारखे धाडसी पाऊल टाकले. डिजिटल इंडियाचा कार्यक्रम राबवून या क्षेत्रात संपूर्ण जगापुढे आदर्श निर्माण केला. खेड्यापाड्यांतील स्त्रियांना चुलीवर स्वयंपाक करावा लागत असल्याने त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो, हे लक्षात घेऊन त्यांनी उज्ज्वला योजनेंतर्गत मोफत घरगुती गॅस सिलिंडरचे वाटप केले. जम्मू-काश्मीरसाठी ३७० वे कलम रद्द केल्यास देशभर रक्तपात होईल, असा बागुलबुवा दाखवला जात असताना हे कलम संपुष्टात आणण्याची खेळी मोदी यांनी केली. त्यानंतर कोणतीही हिंसा झाली नाही. उलट जम्मू-काश्मीर देशाच्या मुख्य धारेत सामील झाला. 'तीन तलाक' सारख्या प्रथेमुळे मुस्लीम महिलांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव ठेवून मोदी यांनी ही प्रथा बंद केली. १९५४ मध्ये देशात वक्फ कायदा लागू झाला.गेल्या ७५ वर्षांत या मडळाकडे असलेल्या जमिनींची संख्या ३५ हजारांवरून १० लाख जमिनींच्या तुकड्यांवर गेली. त्यातील त्रुटी आणि गैरप्रकार दूर करून त्याचा वापर मुस्लीम समुदायाच्या व्यापक कल्याणासाठीच व्हावा, या हेतूने वक्फ दुरुस्ती विधेयक आणण्याचे साहस मोदी यांनी केले. देशात पुन्हा पुन्हा निवडणुका होणे परवडणारे नाही म्हणून 'एक देश एक निवडणूक'चा प्रस्ताव मार्गी लावण्याच्या दिशेने पावले पडत आहेत. तसेच महिला आरक्षण विधेयकही मंजूर केले. नवीन शिक्षण धोरणही राबवण्यास सुरुवात झाली असून, भारतात विदेशी विद्यापीठ स्थापण्यासही उत्तेजन दिले जाते आहे. मोदी यांनी गेल्या अकरा वर्षांत संसदपटुत्व सिद्ध केले असून, अविश्वास ठराव असो वा अन्य चर्चा, विरोधकांना घायाळ करण्याची एकही संधी ते सोडत नाहीत.*

*मंत्रिपदाचा कोणताही अनुभव नसताना दि. ३ ऑक्टोबर २००१ रोजी मुख्यमंत्री केशुभाई पटेल यांची जागा मोदी यांनी घेतली. त्यानंतर गुजरातमध्ये दंगली झाल्या. या दंगलींना मोदी हेच जबाबदार असल्याचे आरोप वर्षानुवर्षे होत आले; पण ते सिद्ध होऊ शकले नाहीत. यातून तावूनसुलाखून बाहेर आलेल्या मोदींनी गुजरातला विकासाच्या शिखरावर नेऊन ठेवले. कोणत्याही संकटांमुळे वा आरोपांमुळे डगमगून न जाता संयमाने आणि धैर्याने परिस्थितीला तोंड देणे, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य. सत्ताधार्यांनी दिलेली आश्वासने गंभीरपणे घ्यायची नसतात, अशी भारतीयांची मानसिकता बनली; पण 'ये मोदी की गॅरंटी हैं' असे सांगत त्यांनी जनतेला ठाम विश्वास दिला. त्यांनी कार्यकाळात पाकिस्तानला सुतासारखे सरळ केले. 'ऑपरेशन सिंदूर' हा त्या ठामपणाचीच परिपूर्ती होती. पाकिस्तान आणि चीन असो वा अमेरिका, त्यांच्या डोळ्याला डोळा भिडवण्याची हिंमत त्यांनी केली. वयाच्या आठव्या वर्षी ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघात गेले आणि गुजरातमध्ये संघाची पाळेमुळे रोवणारे लक्ष्मणराव इनामदार यांच्या छायेत आले. 'चहावाला' म्हणून प्रस्थापितांनी हिणवले, तरी नाउमेद न होता देशाला जगात मानाचे स्थान मिळवून देणारे, हे आधुनिक 'नरेंद्र' आज वयाचा अमृतकाल पूर्ण करत आहेत. त्यांना शुभेच्छा!*

# राष्ट्रनेत्याच्या जन्मदिनापासून राष्ट्रपित्याच्या जयंतीपर्यंत 'सेवा पंधरवडा'

**ब्रिजकिशोर झंवर**
, वरिष्ठ सहायक संचालक,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय.

महसूल विभाग हा जनतेच्या दैनंदिन समस्या आणि जिव्हाळ्याच्या विषयांशी निगडीत असल्याने सामान्य जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक असण्याला प्राधान्य देण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १७ सप्टेंबर या जन्मदिनापासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या २ ऑक्टोबर या जयंतीपर्यंत मोहीम स्वरुपात 'सेवा पंधरवडा' राबविण्यात येत आहे.महसूली क्षेत्रीय कार्यालयाकडून जनतेस सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी २०२५-२६ या वर्षात मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन दि. १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दि. २ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवडा' साजरा करण्यात येणार आहे. या पंधरवड्यात राबविण्यात येणारे कार्यक्रम हे यापूर्वीच राबविण्यात येत असून पंधरवड्यादरम्यान व त्यानंतरही निरंतरपणे राबविले जाणारे कार्यक्रम आहेत. तथापि, या कालावधीत ते मोहीम स्वरुपात युद्धपातळीवर राबविले जाणार आहेत.तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या या अभियानामध्ये १७ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर या कालावधीतील पहिल्या टप्प्यामध्ये 'पाणंद रस्तेविषयक मोहीम' राबविण्यात येईल. दिनांक २३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर या दुसऱ्या टप्प्यामध्ये 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमासाठी पूरक उपक्रम राबविले जातील. तर, २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या अंतिम टप्प्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांमार्फत स्थानिक परिस्थितीचा विचार करुन 'नावीन्यपूर्वक उपक्रम' राबविले जातील.'पाणंद रस्ते'शेतात जाण्यासाठी, शेतमालाची ने-आण करण्यासाठी शेतरस्त्यांच्या निर्मितीसाठी विविध योजनांच्या निधीचा समन्वय साधून समग्र योजना आणली जाणार आहे. यापुढे शेतरस्ता किमान ३ ते ४ मीटर रुंदीचा करण्यात येऊन जमाबंदी आयुक्त यांच्या माध्यमातून शेतरस्त्यांना क्रमांक दिले जाणार आहेत. ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्कांमध्ये शेत रस्त्याची नोंद झाल्यामुळे त्या रस्त्याची कायदेशीर वैधता स्थापित होऊन भविष्यात शेतरस्त्यांच्या वादांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.या अनुषंगाने सेवा पंधरवड्याच्या पहिल्या टप्प्यामध्ये ग्रामीण रस्त्यांच्या सीमांकनाबाबत महसूल विभागाच्या दिनांक २९ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे. याचबरोबर शिव पाणंद रस्त्यांचे सर्व्हेक्षण करणे, ज्या पाणंद रस्त्यांची नोंद निस्तार पत्रक / वाजिब उल अर्ज मध्ये करण्यात आलेली नाही त्याची नोंद घेण्याबाबत कार्यवाही करणे, शेतावर जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करुन देण्यासाठी संमती पत्र घेणे, रस्ता अदालत आयोजित करुन शेतरस्त्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे आदी कामे करण्यात येणार आहेत.सर्वांसाठी घरेसेवा पंधरवड्याच्या २३ ते २७ सप्टेंबर या कालावधीतील दुसऱ्या टप्प्यात 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमांतर्गत घरे बांधण्यासाठी निर्बाध्यरित्या वाटपास उपलब्ध असलेली शासकीय जमीन कब्जेहक्काने प्रदान करण्यात येईल. या उपक्रमासाठी अस्तित्वातील रहिवासी प्रयोजनासाठी असलेली शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमातील तरतुदीनुसार नियमानुकूल करण्यात येतील. या मोहिमेअंतर्गत महसूल विभागाच्या दि. १४ डिसेंबर १९९८ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार आरक्षण विकास आराखड्याशी सुसंगत असल्यास शहरातील जमिनीवरील गायरान नोंदी कमी करुन त्या जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल केली जातील तसेच आरक्षण विकास आराखड्याशी सुसंगत नसल्यास अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी आरक्षण बदलाचे प्रस्ताव सादर करण्यात येतील. या टप्प्यामध्ये सर्वांसाठी घरे योजनेअंतर्गत शासकीय जमिनी वाटप केलेल्या / अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या लाभार्थ्यांना जमिनींचे पट्टे वाटप केले जातील.

नाविन्यपूर्ण उपक्रम-अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यात २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत स्थानिक गरजा, भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जाणार आहेत.राष्ट्राच्या पुनरूत्थानासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या दोन महनीय व्यक्तींच्या जन्मदिन व जयंतीचे औचित्य साधून त्या दरम्यानच्या पर्वात हे अभियान राबविले जाणार असल्याने याचे पावित्र्य राखण्यासाठी तसेच नागरिकांना महसूल विभागाच्या सेवांचा लाभ जलदगतीने मिळवून देण्यासाठी यंत्रणेतील प्रत्येक घटक प्रयत्नांची पराकाष्ठा करणार आहे, हे निश्चित.




## जर झोप न येण्याची समस्या सतावत असेल तर ग्लासभर दुधात मिसळा चिमूटभर जायफळ पावडर!

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक** - जर झोप न येण्याची समस्या सतावत असेल तर यासाठी, सुप्रसिद्ध आयुर्वेदिक डॉक्टर जैदी यांनी झोपण्यापूर्वी गरम दुधात चिमूटभर जायफळाची पूड मिसळून पिण्याचा खास उपाय सांगितला आहे.आपल्या यूट्यूब चॅनेलवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये डॉक्टर सांगतात की, आयुर्वेदामध्ये जायफळ एक नैसर्गिक पद्धतीने झोप आणणारे औषध मानले जाते. यात मायरोस्टिसिन नावाचे एक कंपाऊंड असते, जे मेंदूला शांत करते आणि सेरोटोनिन हार्मोनला सक्रिय करते. सेरोटोनिनपासून मेलाटोनिन तयार होते, जे झोप आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.



एका छोट्या अभ्यासामध्ये असे दिसून आले आहे की, दररोज रात्री २ ग्रॅम जायफळ खाल्ल्याने १५ दिवसांमध्ये लोकांच्या झोपेचा वेळ ३.५ तासांवरून वाढून जवळपास ७ तास झाला आहे. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे, यामुळे केवळ झोपेची गुणवत्ताच चांगली टिकून राहिली नाही, तर कोणत्याही प्रकारचे दुष्परिणाम देखील झाले नाहीत.

झोपण्यापूर्वी साधारणपणे ३० मिनिटे आधी एका ग्लासमध्ये गरम दूध घ्या.

२. त्यात एक चिमूटभर (१/४ चमचा किंवा त्यापेक्षा कमी) जायफळ पावडर टाका.

३. हवे असल्यास, चवीसाठी थोडेसे गूळ देखील आपण घालू शकता.

४. हे दूध शांतपणे बसून हळूहळू प्या आणि नंतर मोबाईल किंवा टीव्ही पाहणे टाळा.

५. खोलीतील लाईट बंद करून आरामात झोपी जा. यामुळे मेंदू शांत होईल आणि गाढ झोप लागेल.

# जनतेच्या विश्वासाचे धनी - मा. देवेंद्र फडणवीस

राष्ट्र भक्कम करायचे असेल तर समाज भक्कम करावा लागतो. समाजाला भ्रष्टाचाराची कीड लागली असेल तर त्यातून समाजाला बाहेर काढणे, हे जिकिरीचे काम असते. मोदीजींनी देशाची सूत्रे घेतल्यापासून सर्वाधिक प्रहार हा भ्रष्टाचार आणि सरकारमधील दलालीवर केला. देशातील विविध क्षेत्रांत दलालांची साखळी संपविण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला. डीबीटी, जनधन आणि आधार यांतून त्यांनी केंद्रातून पाठविलेल्या १०० पैकी १०० रुपये लाभार्थ्यांच्या खात्यात पाठवण्याचा पायंडा सुरू केला. त्यांच्यासाठी पद नव्हे, तर व्यवस्था महत्त्वाची आहे. एकदा राहुल गांधींनी २००८ मध्ये सांगितले होते, माझ्या वडिलांच्या काळात १०० पैकी १५ पैसे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचायचे. परंतु आता तेही पोहोचत नाही. पण, आज स्थिती पूर्णतः बदलली आहे.

२०१४ मध्ये देशात असलेली प्रचंड अनागोंदी, भ्रष्टाचाराच्या साम्राज्याला कंटाळलेला जनमानस आणि त्यातून देशाला एक नवीन आकार देत, भारताचा चौथ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेचा झालेला प्रवास... जगातील तिसरी अर्थव्यवस्था होण्याच्या उंबरठ्यावर असलेला देश. हा संपूर्ण प्रवास असो की, आज अमेरिकेच्या टॅरिफविरोधात आत्मनिर्भर भारत आणि स्वदेशीचा मंत्र घेऊन तितक्याच ठामपणे उभा असलेला भारत. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वकौशल्याचा परिचय आजच्या नव्या भारताने दिला आहे. इतिहासातील घोडचुका दुरुस्त करण्यापासून ते आजच्या आव्हानांना सक्षमपणे तोंड देण्याचा निर्धार असा हा कालखंड पाहायला, अनुभवायला आणि त्या प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी होता येणे, यासारखे भाग्य नाही. हे सारे ज्या वैश्विक नेत्यामुळे घडले, त्या पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांना वाढदिवसाच्या अनेकानेक शुभेच्छा.

राम मंदिर असो, ३७० कलम रद्द करणे असो, तीन तलाकवर बंदी असो, गरीब कल्याणाचा मोठा कार्यक्रम असो, सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक किंवा अगदी अलीकडचे ऑपरेशन सिंदूर असो, उपलब्धी सांगायच्या तर क्षेत्र आणि जागा अपुरी पडेल. महिला, शेतकरी, युवा, वंचित अशा प्रत्येक घटकांसाठी शेकडो निर्णय घेतले नाहीत, तर त्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडते आहे. २५ कोटी लोक दारिद्र्यरेषेतून बाहेर येणे, ही सोपी बाब नाही. या ११ वर्षांत ३ कोटी घरे असोत, १५ कोटी घरांना नळ असो, १२ कोटी शौचालयांची निर्मिती असो, ६८ लाख फूटपाथ विक्रेत्यांना पीएम स्वनिधी असो... अशा कितीतरी योजना सांगता येतील. फक्त एक आकडा पुरेसा आहे. ४३.८ लाख कोटी रुपये थेट लाभार्थ्यांच्या खात्यात आलेले आहेत.

विकसित भारताच्या वाटेवरील सर्वांत महत्त्वाचा भागीदार असलेली आमची नारीशक्ती २०२९ मध्ये ३३ टक्के आरक्षणासह संसद आणि राज्य विधानसभांमध्ये दिसणार आहे. स्टार्टअप, एम्स, आयआयएम, मेडिकल कॉलेज यांची संख्या सातत्याने वाढली आहे. जगाच्या ४९ टक्के डिजिटल व्यवहार करणारा आपला भारत देश आहे. विमानतळे, रेल्वे, महामार्ग, हरितऊर्जा अशा सर्वच क्षेत्रांत यशाची नवनवी शिखरे आपण गाठतो आहोत आणि हे सर्व काही होऊ शकले ते केवळ आणि केवळ नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वामुळे आणि त्यांच्यावरील देशवासीयांच्या विश्वासामुळे.

राजकारणात सलग २५ वर्षे संवैधानिक पदांवर कार्यरत असणे ही सोपी गोष्ट नसते. सलग २५ वर्षे पदांवर राहूनसुद्धा लोकप्रियतेचा आलेख सतत उंचावत राहणे, नव्हे तो वैश्विक होणे, हेच या प्रवासाचे फलित आहे. ही केवळ त्यांच्या लोकप्रतिनिधित्वाची २५ वर्षे



नाहीत, तर संवैधानिक पदांवरील कर्तव्यपूर्तीची आहेत. हा लोकसेवेचा कालखंड आहे. लोककल्याणाचा, सुशासनाचा, नेतृत्वकौशल्याचा, भारतीय मानबिंदू उंचावण्याचा आहे.

नरेंद्र मोदीजींची अनेक वैशिष्ट्ये आहेत. पण, त्यातील सर्वांत महत्त्वाचा भाग कुठला असेल तर ते सर्वांत आधी एक स्वयंसेवक आहेत. पूर्णवेळ प्रचारक होते. त्यानंतर सुद्धा संघटनमंत्री म्हणून मोठ्या कालखंडात त्यांनी भाजपमध्ये काम केले. गेली ११ वर्षे ते पंतप्रधानपदी असताना त्यांनी जो राष्ट्रधर्म जपला आहे, जी कर्तव्यपरायणता जपली आहे, त्याचे रहस्य या त्यांच्या स्वयंसेवकत्वात दडले आहे. स्वयंसेवक हा कर्मयोगी असतो आणि त्याची निर्णयप्रक्रिया अतिशय साधी, सोपी आणि सरळ असते. अगदी आपल्या दोन मित्रांचेच भांडण सुरू असेल तर कोणता तोडगा काढला तर त्यात त्या दोघांचे हित सामावले असेल, घरातील एखादा वाद असेल तर कोणता तोडगा संपूर्ण कुटुंबासाठी हितकारक आहे, हे ओळखून त्याप्रमाणे निर्णय घेतला जातो. मोदींवर तर राष्ट्राची जबाबदारी आहे. त्यामुळे राष्ट्रहिताशी ते कधीही तडजोड करीत नाहीत. ज्यातून राष्ट्रहित साधले जाणार आहे, तोच निर्णय घेण्याकडे त्यांचा कल असतो.

राष्ट्र भक्कम करायचे असेल तर समाज भक्कम करावा लागतो. समाजाला भ्रष्टाचाराची कीड लागली असेल तर त्यातून समाजाला बाहेर काढणे, हे जिकिरीचे काम असते. मोदीजींनी देशाची सूत्रे घेतल्यापासून सर्वाधिक प्रहार हा भ्रष्टाचार आणि सरकारमधील दलालीवर केला. देशातील विविध क्षेत्रांत दलालांची साखळी संपविण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला. डीबीटी, जनधन आणि आधार यातून त्यांनी केंद्रातून पाठविलेल्या १०० पैकी १०० रुपये लाभार्थ्यांच्या खात्यात पाठवण्याचा पायंडा सुरू केला. त्यांच्यासाठी पद नव्हे, तर व्यवस्था महत्त्वाची आहे. एकदा राहुल गांधींनी २००८ मध्ये सांगितले होते, माझ्या वडिलांच्या काळात १०० पैकी १५ पैसे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचायचे. पण, आता तेही पोहोचत नाहीत. पण, आज स्थिती पूर्णतः बदलली आहे.

राष्ट्र म्हणून एक भक्कम व्यवस्था उभी करणे आवश्यक असते. शत्रूला नामोहरम करते, तेच राष्ट्र सामर्थ्यशाली असते. २०१६ मध्ये उरीचा हल्ला झाला तेव्हा अवघ्या ११ दिवसांत भारताने सर्जिकल स्ट्राईकने उत्तर दिले. पाकव्याप्त काश्मिरातील दहशतवादी तळ नष्ट केले. पाकिस्तानच्या उच्चायुक्तांना बोलावून कडक शब्दांत समज दिली. २०१९च्या प्रारंभी पाकिस्तानने पुलवामामध्ये पुन्हा आगळीक केली. त्याला बालाकोटच्या हवाई हल्ल्यांनी उत्तर दिले गेले. यात पाकिस्तानच्या हद्दीत घुसून हवाई हल्ले करीत दहशतवाद्यांचे तळ नष्ट करण्यात आले. या दोन घटनांनी भारताच्या संरक्षणविषयक धोरणाच्या दिशा स्पष्ट केल्या. नवा भारत कसा असेल, हे मोदीजींनी संपूर्ण जगाला ठणकावून सांगितले. हे भारताचे 'न्यू नॉर्मल' होते. आता अलीकडे पहलगाम झाले, त्याला ऑपरेशन सिंदूर हे उत्तर होते.

आपले आराध्य छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर वाटचाल करणारे आपले पंतप्रधान आहेत. म्हणून महाराष्ट्राचे विषय आले तर मोदीजींच्या प्राधान्यक्रमावर ते असतात. इंदू मिलच्या स्मारकासाठी ३५०० कोटींची जागा एका झटक्यात देणे असो की, पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांसाठी ते भक्कमपणे पाठीशी उभे असतात. मोदीजींनी महाराष्ट्राचा एकही विषय प्रलंबित ठेवला नाही. यावर्षी तर प्रधानमंत्री आवास योजनेतील ३० लाख घरे त्यांनी महाराष्ट्राला दिली. आज महाराष्ट्रात १० लाख कोटींची पायाभूत सुविधांची कामे सुरू आहेत, यामागे निश्चितपणे मोदीजींचे भक्कम पाठबळ आहे.

महाराष्ट्र हे सातत्याने एफडीआयमध्ये क्रमांक १ चे राज्य राहिले आहे. यामागे सुद्धा मोदीजींचा भक्कम पाठिंबा आहे. वाढवण पोर्ट असेल, नवी मुंबईचे विमानतळ असेल, पुण्याचे नवीन विमानतळ, नागपूर विमानतळाचे आधुनिकीकरण, अमरावती विमानतळ, अमरावतीचा टेक्स्टाईल पार्क, गडचिरोली पोलाद सिटी, पालखी मार्ग, मेट्रोचे मुंबई, नागपूर, पुण्यातील प्रकल्प, पालखी मार्ग, छत्रपती संभाजीनगरमधील डीएमआयसी, ऑरिक सिटी, जलसंधारणाचे प्रकल्प, त्यातही महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांसाठी विशेषत्वाने मिळालेले पॅकेज, जे अन्य कुठल्याही राज्यांना मिळालेले नाहीत, प्रत्येक प्रकल्पात मोदीजी भक्कमपणे उभे राहिले आणि आहेत.

नरेंद्र मोदीजींशी अनेकदा वैयक्तिक भेटी झाल्या, अनेकदा त्यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले. त्यामुळे समस्या सांगितली की, त्यावरील समाधान त्यांच्याकडे हमखास मिळते. दोन गोष्टीत ते कधीही गल्लत करीत नाहीत. जेव्हा पक्षाचा विषय असतो, तेव्हा ते सरकार मध्ये आणत नाहीत आणि जेव्हा सरकारी विषय असतो, तेव्हा पक्ष मध्ये आणत नाहीत. अगदी भेटीच्या वेळेतही पक्ष आणि विकासाचे विषय अशी स्वतंत्र रचना चर्चेची असते. या राष्ट्रनेत्याच्या हातून अशीच देशसेवा घडत राहो, त्यासाठी त्यांना दीर्घ आणि निरोगी आयुष्य लाभो, यासाठी मी त्यांना अतिशय मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

# संत्रा पिकात बुरशीजन्य रोग? जाणून घ्या सुरक्षितता उपाय

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**


संत्रा पिकाचे आरोग्य जपणे म्हणजे उत्पादन वाढवण्याचा सर्वात महत्त्वाचा घटक. पावसाळ्यात झाडांच्या बुंध्याजवळ ओलसरता राहिल्यास बुरशीजन्य रोगाचा धोका वाढतो.योग्य वेळी निदान, सेंद्रिय तसेच रासायनिक उपचार आणि चांगले पाणी व्यवस्थापन यामुळे बागेतले संत्रा झाडे दीर्घकाळ निरोगी राहू शकतात.संत्रा आणि मोसंबी हे प्रमुख बागायती पिके आहेत. यांच्या उत्पादन वाढवण्यासाठी योग्य पाणी व्यवस्थापन, खतांचा योग्य वापर आणि रोगनियंत्रण आवश्यक आहे.

पावसाळा किंवा ओलसर हवामानात संत्रा बागेत बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. या रोगांमुळे झाडांची वाढ खुंटते, पानगळ होते, बुंधा कुजतो आणि शेवटी झाड मरते. योग्य वेळी निदान आणि उपचार न केल्यास मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते.

**बुरशीजन्य रोगांची माहिती**

**रोगाची कारणे**

फायटोफ्थोरा ही बुरशी संत्रा झाडांवर हल्ला करून मुळकुज, बुंध्याकुज, डिंभ्या आणि पानगळ यांसारखे रोग निर्माण करते.पाण्याचा साठा, निकस निचऱ्याची जमीन, सतत ओलसर वातावरण हे या रोगाला अनुकूल असते.




**रोगाची लक्षणे**

झाडाच्या बुंध्याजवळील साल सोलून आतून तपकिरी रंग दिसतो. पाने पिवळी पडून गळतात, फांद्या कोमेजतात.

रोग वाढल्यास झाडाच्या बुंध्याजवळ पाणी साचते आणि झाड कोरडे पडते.तीव्र प्रादुर्भाव झाल्यास संपूर्ण झाड मरते.

**रोगाचा प्रसार**- सतत ओलसर जमीन, पाण्याचा साठा, पावसाळ्यातील जास्त आर्द्रता यामुळे रोग झपाट्याने पसरतो.

संक्रमित माती, पाणी किंवा झाडांच्या फांद्यांमुळेही रोगाचा प्रसार होतो.

**रोग व्यवस्थापन**- बागेत नेहमी योग्य निचऱ्याची सोय ठेवावी.

झाडांच्या बुंध्याजवळ पाणी साचू नये यासाठी मातीची योग्य बांधणी करावी.

झाडांच्या बुंध्याजवळील गवत, कचरा, सडलेली पाने काढून टाकावीत.

झाडांमध्ये हवा खेळती राहील यासाठी फांद्यांची छाटणी करावी.

**सेंद्रिय उपाय**- ट्रायकोडर्मा पावडर (१०० ग्रॅम) प्रति झाड सेंद्रिय खतामध्ये मिसळून मातीमध्ये द्यावी.

ट्रायकोडर्मा संस्कृती पिकाच्या जमिनीत नियमित टाकल्याने मातीतील उपयुक्त सूक्ष्मजंतू वाढतात आणि बुरशीजन्य रोगांचे प्रमाण घटते.

**रासायनिक नियंत्रण**

**बोर्डो पेस्टचा वापर**

१ किलो चुना + १ किलो कॉपर सल्फेट + ५ लिटर पाणी मिसळून पेस्ट तयार करावी.पावसाळ्याच्या सुरुवातीला आणि पावसानंतर झाडाच्या बुंध्यावर पेस्ट लावावी.

**फवारणी**फॉस्फोनेट एम.झेड. ६८ (२.५ मि.ली./लिटर) किंवा फॉस्फोनेट एल (२.५ मि.ली./लिटर) यांचा ८-१० दिवसांच्या अंतराने फवारा करावा.४० दिवसांच्या अंतराने पुन्हा फवारणी करावी. मेन्कोझेब २५ ग्रॅम/१० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाॅट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १७ सप्टेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांची सोयाबीन प्रादेशिक अनुसंधान केंद्रास भेट व पाहणी

## शेतकरी बांधवांनी संशोधीत सोयाबीन वाणांची माहिती घेण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती** –डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अधिनस्त असलेल्या अखिल भारतीय समन्वयीत सोयाबीन संशोधन प्रकल्प-प्रादेशिक अनुसंधान केंद्रास विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी आज भेट दिली. या केंद्राव्दारे संशोधन करुन लागवड करण्यात आलेल्या सोयाबीनच्या विविध वाणांची पाहणी व त्याबाबत सविस्तर माहिती विभागीय आयुक्तांनी जाणून घेतली. अमरावती विभागातील सर्व शेतकरी बंधू-भगिनींनी या केंद्राव्दारे संशोधित सोयाबिन वाणांची पाहणी करुन त्याबाबतचे फायदे जाणून घेऊन लागवडीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी यावेळी केले.

यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरु शरद गडाख, पीकेव्हीचे संचालक (संशोधन) डॉ. श्यामसुंदर माने, संचालक (शिक्षण व विस्तार) डॉ. धनराज उंदिरवाडे, प्रभारी विभागीय कृषी सहसंचालक तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, यवतमाळचे एसएओ संतोष डाबरे, अकोल्याचे एसएओ शंकर किरवे, प्रादेशिक अनुसंधान केंद्राचे प्रमुख डॉ. सतीश निचळ, कृषी उपसंचालक वरुण देशमुख यांच्यासह अनुसंधान केंद्राचे अधिकारी व कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी



उपस्थित होते.डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्याव्दारे विद्यापीठ परिसरात दि. २०, २१ व २२ सप्टेंबर या तीन दिवसांच्या कालावधीत शेतकऱ्यांसाठी पिकांची लागवड पध्दती, शेती विषयक महत्वाच्या बाबी या विषयांवर कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे कृषी विभागाच्या समाजमाध्यमांव्दारे सर्वीकडे प्रसारण होणार आहे, याचा शेतकरी बंधु- भगिनींनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरु श्री. गडाख यांनी याप्रसंगी केले.

अमरावती प्रादेशिक संशोधन केंद्र हे अखिल भारतीय समन्वयीत सोयाबीन संशोधन प्रकल्पाचे मुख्य संशोधन केंद्र असून या केंद्राव्दारे सोयाबीनचे सहा वाण व ३६ संशोधनात्मक शिफारशी शेतकऱ्यांसाठी प्रसारित केलेल्या आहेत. या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शेतकरी बंधु भगिनींना सोयाबीनचे विविध वाण प्रत्यक्ष पाहता यावेत. या वाणांचे गुणधर्म व वैशिष्ट्ये समजून घेऊन त्यामधून आपल्यासाठी वाण निवडता यावा, याकरिता या केंद्रावर व्हेरायटल कॅफेटेरिया लावण्यात आला असून यामध्ये मध्य व दक्षिण विभागाकरिता शिफारशीत एकूण ४४ वाणांची लागवड करण्यात आलेली आहे, अशी माहिती अनुसंधान केंद्राचे प्रमुख डॉ. निचळ यांनी यावेळी उपस्थितांना दिली.

## कामगार सेवा रुग्णालयात

# वैद्यकीय अधिकाऱ्यांसह १२ कर्मचारी लेटलतीफ

### नांदगाव पेठ येथील प्रकार

### सकाळी ८ ऐवजी ९:३० वाजता उघडले रुग्णालय

### प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तपासणीत फुटले बिंग




**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७ नांदगाव पेठ**
कामगारांच्या उपचाराची सुविधा देणाऱ्या राजपूत पुरा नांदगाव पेठ येथील कामगार विमा सोसायटीच्या सेवा दवाखान्यात गंभीर निष्काळजीपणाचा प्रकार उघड झाला आहे. ठरलेल्या वेळेनुसार सकाळी आठ वाजता सुरु व्हायच्या सेवांची सुरुवात तब्बल दीड तास उशिरा म्हणजे सकाळी ९.३० वाजता झाली. यामध्ये दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी यांच्यासह तब्बल बारा कर्मचारी लेटलतीफ असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले असून या निष्काळजी कारभारामुळे उपचारासाठी आलेल्या रुग्णांना गंभीर गैरसोयीचा सामना करावा लागला. दि. १३ सप्टेंबर रोजी सकाळी आठ वाजता प्रभारी विमा वैद्यकीय अधिकारी भूषण मसराम हे दवाखान्यात दाखल झाले असता, जवळपास संपूर्ण रुग्णालय रिकामे असल्याचे चित्र त्यांच्या नजरेस पडले. ठरलेल्या वेळेत हजर राहण्याऐवजी वैद्यकीय अधिकारी, कनिष्ठ लिपिक ललित मुंदाणे, अधिपरिचारिका रोहिणी यावले, औषध निर्माता मोहम्मद कामरान, व्रनोपाचारीका उज्ज्वला मडावी, बहुउद्देशीय कर्मचारी धम्मा वानखडे व रोहन डुकरे, लिपिक नीता क्षीरसागर यांच्यासह बहुसंख्य कर्मचारी अनुपस्थित होते. केवळ दोन कर्मचारी उपस्थित असल्यामुळे रुग्णालयाचा सर्वच कारभार ठप्प झाल्याचे दृश्य पाहायला मिळाले. प्रभारी अधिकाऱ्यांनी तत्काळ संबंधितांना दूरध्वनीद्वारे संपर्क करण्याचा प्रयत्न केला मात्र कोणीही वेळेत रुग्णालयात पोहोचले नाही. दरम्यान, दवाखान्याचा अधिकृत वेळ सकाळी ८ ते दुपारी १ असा असतानाही सकाळच्या महत्त्वाच्या वेळेत बहुतेक कर्मचारी अनुपस्थित राहिल्याने शेकडो रुग्णांना वेळेवर उपचार मिळाले नाहीत. अनेक रुग्ण लांबून येऊनही रिकाम्या हाताने परतल्याने संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. कामगारांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या अशा कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी मागणीही पुढे येत आहे. प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी या प्रकाराची नोंद लेखी स्वरूपात वैद्यकीय प्रशासन अधिकारी, अमरावती यांच्याकडे करून संबंधितांवर कठोर कार्यवाहीची मागणी केली आहे. दररोज शेकडो रुग्ण उपचारासाठी गर्दी करत असलेल्या या दवाखान्यातील कर्मचाऱ्यांचा बेजबाबदार कारभार उघड झाल्याने कामगारांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे.

# नागपुरी गेट चौक ते जमील कॉलनी ते ट्रान्सपोर्ट नगर ते वलगाव रोड,परिसरात अतिक्रमणांवर धडाकेबाज कारवाई

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१७अमरावती**
अमरावती महानगरपालिकेने जेसीपीद्वारे नागपुरी गेट चौक ते जमील कॉलनी ते ट्रान्सपोर्ट नगर ते वलगाव रोड, वली चौक परिसरात अतिक्रमणावर मोठी कार्यवाही राबवली. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या आदेशानुसार व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडली.

सदर परिसरातील रस्ते, फूटपाथ व सार्वजनिक ठिकाणी करण्यात आलेली अतिक्रमणे हटवण्यात आली. यामध्ये झोपड्या, शेड, पत्र्याचे शेड, बेकायदेशीर बांधकाम, तसेच व्यवसायिकांनी पसरवलेल्या जागेवरची सामग्री हटवण्यात आली.

या कारवाईमुळे परिसरातील मुख्य रस्ते आणि सार्वजनिक ठिकाण मोकळे झाले असून वाहतूक सुलभ झाली आहे. नागरिकांच्या तक्रारींनुसार ही मोठी कारवाई करण्यात आली असून अतिक्रमण पुन्हा करू नये, अन्यथा कठोर कारवाई केली जाईल असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आवाहन केले की, ट्रान्सपोर्ट नगर परिसरात राबविण्यात आलेली अतिक्रमणावर कारवाई ही नागरिकांच्या सोयीसाठी आणि सुरळीत वाहतुकीसाठी करण्यात आलेली आहे. रस्ते, फूटपाथ आणि सार्वजनिक ठिकाणे ही सर्वांची सामाईक मालमत्ता असून त्यावर कोणीही बेकायदेशीररीत्या कब्जा करू नये. महानगरपालिकेच्या वारंवार सूचनांनंतरही काही ठिकाणी अतिक्रमण केले जात असल्यामुळे ही कारवाई अपरिहार्य ठरली. नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने अतिक्रमण टाळून महानगरपालिकेला सहकार्य करावे. शहराचा विकास, स्वच्छता व वाहतुकीची सुलभता



यासाठी मनपा प्रशासनाबरोबर प्रत्येक नागरिकाची साथ आवश्यक आहे. अतिक्रमणावर कारवाई सतत सुरू राहणार असून नियमांचे पालन करणे ही सर्वांची जबाबदारी आहे.

शहरात अतिक्रमणांची समस्या अतिशय गंभीर झाली आहे. रस्त्याच्या कडेला किंवा जागा दिसेल तिथे अतिक्रमणे केली जातात. काही तर पक्के शेड ठोकून अतिक्रमणे करतात. या अतिक्रमणांमुळेच शहरात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. आताही महानगरपालिका प्रशासनाने पुन्हा एकदा या अतिक्रमणांना रडारवर घेतलं आहे. शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू झाली आहे. पाहता पाहता अतिक्रमणे जमीनदोस्त होऊ लागली आहेत. काही जणांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेण्यास सुरुवात केली आहे.

महानगरपालिकेच्यावतीने अतिक्रमण मोहिम सुरू असून आज दिनांक १६ सप्टेंबर,२०२५ रोजी, सकाळी ११ वाजता पासून जेसीपीद्वारे नागपुरी गेट चौक ते जमील कॉलनी, ते ट्रान्सपोर्ट नगर ते वलगाव रोड, वली चौक पर्यंत महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. जोपर्यंत शहरातील रस्ते व फूटपाथ मोकळे होणार नाही तोपर्यंत ही अतिक्रमणाची कारवाई सुरू राहील. ज्यांनी अतिक्रमण केलं असेल त्या सर्वांनी अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे अन्यथा महानगरपालिका प्रशासन काढून घेईल. तसेच कायदेशीर कारवाईलाही सामोरे जावे लागेल असा इशारा अतिक्रमण पथक प्रमुख यांनी दिल्या. या इशाऱ्याने अतिक्रमण धारकांचे धाबे दणाणले आहे.

सदर कार्यवाहीत सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, उपअभियंता विवेक देशमुख, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, निरीक्षक अन्सार अहमद, बबलू सोनवणे, शुभम पांडे, अतिक्रमण विभागातील कर्मचारी, पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

# विद्युत अभियंता सोबत अरेरावीची भाषा व अंगावर जाणे आले अंगलट

### महावितरण कंपनीने स्टेशनला तक्रार केल्याने एकावर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अंजनगाव सुर्जी**
अंजनगाव सुर्जी शहरातील भालदापूर येथे राहत असलेल्या वीज मीटर ग्राहक खान मुस्तका खान मुस्तपरवीन यांनी महावितरण विभागाचे सहायक अभियंता अजय चौधरी यांच्याशी अरेरावी ची भाषा व त्यांच्या शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी भादवी ३५३ नुसार अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मुजीब खान मुस्तका खान राहणार भालदरपुरा यांचा वीज पुरवठा काही दिवसापूर्वी महावितरण विभागाने तात्पुरता खंडित करण्यात आला होता त्याकरिता महावितरण कंपनीच्या कर्मचारी माया कुबडे वरिष्ठ तंत्रज्ञ वीज बिल वसुली व तात्पुरत्या खंडित केलेल्या विविध पुरवठा याची तपासणी करिता गेल्या असतात वीज ग्राहक मुजीब खान यांनी दमदाटी करून तसेच अरेरावीची भाषा वापरल्याने त्या महिला कर्मचाऱ्यांनी सहाय्यक विद्युत अभियंता अजय विलास चौधरी यांना घटनास्थळी बोलावून सदर विषयाची माहिती दिली त्यांनी वीस ग्राहकाला समजून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु मुजीब खान यांनी विद्युत अभियंता सोबत अरेरावी व कामात अडथळा निर्माण केला तसेच वीज ग्राहक बाजूच्या घरातून चोरून वीज वापरत असलेले सुद्धा निर्दर्शनास दिसून येत होते त्यावरून अंजनगाव पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास अंजनगाव सुर्जी पोलीस करीत आहे.

# दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीला राज्यस्तरीय सर्वोच्च गौरव

### समितीच्या इतिहासात पहिल्यांदाच मिळाला मानाचा पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७दर्यापूर : –** दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने आपल्या उत्तुंग कार्याचा ठसा उमटवत राज्यस्तरावर पहिल्यांदाच मानाचा बहुमान पटकावला आहे. महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ, पुणे यांच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा आदरणीय वसंतदादा पाटील स्मृती पुरस्कार दर्यापूर बाजार समितीला जाहीर झाला असून, यामुळे संपूर्ण परिसरात अभिमान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.राज्यातील तब्बल ३२२ बाजार समित्यांमधून फक्त २० समित्यांची निवड करून हा मानाचा पुरस्कार देण्यात आला आहे. त्यामध्ये दर्यापूर बाजार समितीचा समावेश झाल्याने समितीचा लौकिक सर्वदूर पोहोचला आहे. या पुरस्कारामुळे समितीच्या कार्यपद्धतीला आणि पारदर्शी धोरणांना राज्य पातळीवर दुजोरा मिळाल्याचे मानले जात आहे.या ऐतिहासिक क्षणी समितीचे दूरदर्शी नेतृत्व करणारे सभापती मा. सुनिल




पाटील गावंडे तसेच संचालक बाळासाहेब हिंगणिकर, साहेबराव भदे, गजानन पाटील देवतळे, सुनील डिके, राजेश खेडकर, प्रभाकर पाटील तराळ, अनिल पाटील भारसाकडे आणि अमोल पाटील अरबट तसेच अमरावती जिल्ह्यातील नानाभाऊ नागमोते हे मान्यवर उपस्थित होते.दर्यापूर बाजार समितीच्या स्थापनेपासून प्रथमच मिळालेल्या या राज्यस्तरीय सन्मानामुळे शेतकरी, व्यापारी वर्ग आणि नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह असून समितीच्या कार्यक्षम नेतृत्वाचे कौतुक होत आहे. या पुरस्काराने दर्यापूर बाजार समितीचा नावलौकिक केवळ जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात उजळून निघाल्याचे गौरवोद्गार सर्वत्र काढले जात आहेत.

# प्रधानमंत्री आवास योजनेला गती – आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–**
महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी १६ सप्टेंबर रोजी विठ्ठलवाडी जुनीवस्ती व पवननगर नवीवस्ती येथील प्रधानमंत्री आवास योजनेच्या साईटची पाहणी केली. नागरिकांच्या तक्रारींनुसार साफसफाई व रस्त्यांची तपासणी करून त्रुटी दुरुस्त करण्याचे निर्देश कंत्राटदारांना देण्यात आले.

साईटवरील काही



अडथळ्यांबाबत तात्काळ पोलिसांना नियमित पेट्रोलिंग करण्याचे आदेश दिले.

आयुक्तांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व निराकरणाचे आश्वासन दिले.

प्रधानमंत्री आवास योजना ही सामान्य नागरिकांच्या मूलभूत गरजांशी निगडीत असून, शहराच्या विकासासाठी प्रशासन, कंत्राटदार व नागरिकांचा समन्वय आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांनी अडथळे न आणता सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी आयुक्तांनी केले.

या पाहणीत शहर अभियंता रविंद्र पवार, उपअभियंता लक्ष्मण पावडे, डॉ.अजय जाधव, भुषण पुसतकर आदी अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# ॲड. हेलोंडे पाटील यांची आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती,**
कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी आज दि. १६ सप्टेंबर रोजी शिवणी रसुलापूर, ता. नांदगाव खंडेश्वर येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब सुफला योगेश नेरकर यांच्या घरी भेट दिली.यावेळी त्यांनी कौटुंबिक माहिती घेऊन शासकीय योजनेचा लाभ घेतला असल्याबाबत माहिती घेतली. नेरकर कुटुंबाला



उर्वरित योजनाचा लाभ देण्याबाबत विभाग प्रमुखांना सूचना दिल्या. तसेच शिवनी, रसूलापूर येथील सोयाबीन पिकाची पाहणी करून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या.भेटी दरम्यान तहसीलदार अश्विनी जाधव, गट विकास अधिकारी डॉ. श्रीमती. स्नेहल शेलार, तालुका कृषी अधिकारी विकास पाटील, महिला व बालविकास अधिकारी श्री. गलफड, ग्राम महसूल अधिकारी अश्विनी उईके, वैभव लाड, कृषी सहायक पुरुषोत्तम वंजारी, सरपंच शशिकला खडसे, चंद्रशेखर गावंडे, गजानन देशमुख, पोलीस पाटील प्रवीण इरतकर, चंद्रशेखर गावंडे उपस्थित होते.

# परतीचा पाऊस बनला शेतकऱ्यांसाठी कर्दनकाळ

## सोयाबीन पिकाला जोरदार फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती –** अमरावतीसह जिल्ह्यात शेतीसाठी पुरेसा पाऊस बरसला. शेतात चांगलं पिक डोलायला लागलं असताना विजांच्या कडकडाटासह परतीचा पाऊस मुसळधार कोसळत असल्यानं शेतकऱ्यांच्या हृदयाचे ठोके वाढले आहेत. सोमवारी अनेक भागात शेतात पाणी तुंबल्यानं सोयाबीन पीक अक्षरशः सडायला लागलं, अशी परिस्थिती आहे.



सातपुडा पर्वत रांगेत मेळघाटात गत ४८ तासांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. चिंतेची बाब म्हणजे हवामान विभागानं आणखी दोन दिवस सावधतेचा इशारा दिलाय. सोमवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अमरावती शहरात ढग भरून आले. साडेचार वाजता वीजांच्या प्रचंड कडकडाटांसह मुसळधार पाऊस कोसळला. शहरातील प्रवीण नगर परिसरात सायंकाळी वीज कोसळली. सायंकाळी सुरू झालेला मुसळधार पाऊस रात्री ८ वाजता थोडा थांबला. मात्र, रात्री ९ नंतर पुन्हा रात्रभर रिमझिम बरसला. मंगळवारी दुपारी २ वाजता आकाशात काळे ढग दाटून आलेत अमरावती शहरासह लगतच्या परिसरात मुसळधार पाऊसबरसायला लागला.पाऊस सप्टेंबर आणि ऑक्टोबरच्या सुरुवातीपर्यंत असल्याचे हवामान खात्याने सांगितलें. अशा परिस्थित आता काढणीला आलेलं सोयाबीनमध्ये आर्द्रता भरपूर राहते. शेतकऱ्यांजवळ ही आर्द्रता कमी करण्याचं कुठलही साधन नाही. तसेच जागा नाही. गावात पीक ठेवायला शेतकऱ्यांकडे जागा नाही. यामुळं सोयाबीन शेतातून काढलं की बाजारात नेऊन विकावं लागतं. शेतमालात २५ ते ३० टक्के आर्द्रता असली की भाव मिळत नसल्यानं शेतकऱ्यांचं मोठं आर्थिक नुकसान होते आहे.आणखी आठवडाभर पाऊससंपूर्ण विदर्भात सध्या परतीचा पाऊस आहे. हा पाऊस आणखी आठवडाभर राहण्याची शक्यता आहे. अनेक भागात विजांचा प्रचंड कडकडाट होण्याचा अंदाज शिवाजी कृषी महाविद्यालयाचे हवामान विभाग प्रमुख प्रा. अनिल बंड यांनी व्यक्त केला.

# टाकरखेडा संभू परिसरात जोरदार पाऊस

## गावात पाणी शिरले, शेती झाली जलमय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७भातकुली** भातकुली तालुक्यातील टाकरखेडा संभू येथे मंगळवारी दुपारी पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. दुपारी एक ते दोन वाजेदरम्यान तब्बल एक तास कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे गावात पाणी शिरून घरे, शेत आणि रस्ते जलमय झाले.

पावसामुळे आष्टी ते टाकरखेडा संभू मार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले. त्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली. जिल्हा परिषद शाळा येथून जाणारा जळका मार्ग देखील कमरेपर्यंत पाण्याखाली गेला होता. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. गावातील लगतच्या काही भागातील पिके पाण्याखाली गेल्याने शेतकर्यांचे नुकसान झाले. परिसरातील जिल्हा परिषद शाळा व उर्दू शाळा या दोन्ही ठिकाणचे विद्यार्थीदेखील पावसाच्या पाण्यात अडकले. अखेर गावकर्यांनी मुलांना खांद्यावर उचलून सुरक्षित घरी



पोहोचवले. अचानक झालेल्या या मुसळधार पावसामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. प्रशासनाकडून तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

### शहरासह जिल्ह्यात पाऊस

जिल्ह्यासह शहरात दुपारपासून पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी रिमझीम तर काही भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस आला. मंगळवारी सकाळी १० वाजेपर्यंत झालेल्या २४ तासात जिल्ह्यात सरासरी ८.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. काल अमरावतीत २५.५ मिमी पावसाची नोंद झाली.

# देशी दारूची एमआरपीपेक्षा जास्त दराने विक्री,सात दुकानांवर कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती,** किरकोळ किंमतीपेक्षा जास्त दराने देशी दारूची विक्री करणाऱ्या सात दुकानांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली आहे. विभागाने बनावट ग्राहक पाठवून केलेल्या तपासणीत ही बाब निदर्शनास आली आहे.या प्रकरणी, विजय बी. जयस्वाल (अनुज्ञप्ती क्र. १६०, बडनेरा रोड), मे. एस. पी. लिकर्स (अनुज्ञप्ती क्र. ११६, मालखेड रेल्वे), श्रीमती शोभा नरेश जयस्वाल (अनुज्ञप्ती क्र. ७४, अचलपूर), श्रीमती सलीमाबी अब्दुल खलीद (अनुज्ञप्ती क्र. ५६, अंजनगाव सुर्जी), श्रीवास्तव वाईन्स (अनुज्ञप्ती क्र. ७१, अंजनगाव सुर्जी), श्री. व्ही. बी. भगत (अनुज्ञप्ती क्र. ७८, नांदगावपेठ), आणि श्री महाराष्ट्र वाईन्स (परतवाडा) या अनुज्ञप्तीधारकांवर कारवाई



करण्यात आली आहे.या दुकानांमध्ये कमाल किरकोळ किंमतीपेक्षा १० रुपये जास्त दराने देशी दारू विकली जात असल्याचे निष्पन्न झाले आहे. या संदर्भात, जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचा दंड भरण्याची प्रकरणे सादर करण्यात आली आहेत. तसेच, सातही अनुज्ञप्तीधारकांना एकूण तीन लाख पन्नास हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.ही रक्कम १५ दिवसांत शासनाकडे जमा न केल्यास व्याजासह दंडाची रक्कम वसूल केली जाईल आणि अनुज्ञप्ती निलंबित केली जाईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. ग्राहकांना जास्त दराने देशी दारू विकली जात असल्यास त्यांनी टोल फ्री क्र. १८००८३३३३३३ किंवा व्हॉटसप क्र. ८४२२००११३३ वर तक्रार नोंदवावी, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात आले आहे.-

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान अंतर्गत महिलांसाठी आरोग्य सेवा शिबिरांना आजपासून सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–** जिल्ह्यामध्ये दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानराबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, क्षयरोग रुग्णालय, तसेच विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे आरोग्य स्टॉल आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या अभियानाचा उद्देश महिलांना त्यांच्या घराजवळच आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, तसेच त्यांना अधिक निरोगी, सशक्त आणि आत्मनिर्भर बनवणे हा आहे.

**उपलब्ध सेवा आणि सुविधा:** असंसर्गजन्य रोगांसाठी तपासणी: उच्च रक्तदाब आणि मधुमेहासाठी स्क्रीनिंग, तसेच मुख, स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोगासाठी तपासणी आणि निदान.टीबी तपासणी: सहायक महिलांसाठी क्षयरोगाची तपासणी केली जाईल.ॲनिमिया आणि सिकलसेल तपासणी: किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी ॲनिमियाची तपासणी आणि सल्लागार सेवा उपलब्ध असेल. आदिवासी भागातील महिलांसाठी सिकलसेल रोगाची तपासणी, आनुवंशिक सल्ला आणि कार्डचे वितरण केले जाईल.




**गर्भवती महिलांसाठी सेवा:** हिमोग्लोबिन तपासणी, पोषण आणि देखरेखीबद्दल सल्ला, तसेच मातृ व बाल संरक्षण कार्डचे वितरण केले जाईल. मुली आणि गर्भवती महिलांसाठी वेळेनुसार लसीकरण सेवा उपलब्ध असेल.

**जागरूकता सत्रे:** किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी मासिक पाळीच्या स्वच्छतेबद्दल आणि पोषणावर जागरूकता सत्रांचे आयोजन केले जाईल.

**मानसिक आरोग्य समुपदेशन:** मानसिक आरोग्याच्या समस्यांवर जागरूकता आणि समुपदेशन केले जाईल.इतर सेवा: स्वयंसेवी गटांच्या महिला प्रतिनिधींमार्फत तेल आणि साखरेचा वापर कमी करण्यासाठी मोहीम राबविली जाईल. तसेच, पोषण आहारासाठी आहार समुपदेशन देखील केले जाईल. याव्यतिरिक्त, रक्तदान शिबिरे, झच-ग-ध आणि -इक- कार्ड नोंदणी, तसेच क्षयरोग रुग्णांसाठी स्वयंसेवकांची नोंदणी यासारख्या सेवा देखील उपलब्ध असतील. या अभियानातून जास्तीत -जास्त महिलांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांनी केले आहे.

# शेततळ्यात बुडून ११ वर्षीय बालकाचा मृत्यू

## विरगव्हाण शिवारातील घटना, गावात सर्वत्र हळहळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–** नजिकच्या विरगव्हाण येथील ११ वर्षीय बालकाचा शेततळ्यात बुडून दुर्दे वी मृत्यू झाला. ही घटना रविवारी (ता.१४) दुपारी १२ वाजतानंतर घडली.



ध्रुप असे मृत मुलाचे नाव आहे. तो रविवारी दुपारी १२ वाजता घरातून बाहेर खेळायला गेला होता. मात्र तो घरी परतलाच नाही. त्याचा शोध घेतला असता विरगव्हाणपासून १ किलोमीटर अंतरावर एका शेतातील शेततळ्यात ध्रुपचा मृतदेह आढळून आला. त्याचा बुडून मृत्यू झाल्याचे समजते. या घटनेमुळे गावात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान बचाव पथकाने मृतदेह बाहेर काढून तिवसा उपजिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार चार ते पाच मित्र पोहण्याकरिता शेततळ्यात गेले होते. ध्रुप हा तलावात बुडाल्याचे पाहून सर्व मित्र तेथून पळून गेल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच तिवसा तहसीलदारांनी गावात भेट देत बाकी मुलांना विश्वासात घेऊन विचारणा केली, परंतु त्या मुलांनीकाहीही माहिती दिली नाही.

१६ सप्टेंबर रोजी जिल्हा शोध व बचाव पथकाला पाचारण करून शेततळयात शोध राबविली असता ध्रुपचा मृतदेह नग्न अवस्थेत आढळून आला. तर त्याचे कपडे चप्पल घटनास्थळी आढळून आली नाही. बचाव पथकाने मृतदेह बाहेर काढून तिवसा उपजिल्हा रुणालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठविला. पुढील तपास कुऱ्हा पोलीस करित आहे.

# सिमेंट कॉंक्रीट व डांबरी रस्त्यांच्या जोडीत चढ-उतार : वाहनधारक त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–** शहरातील अनेक भागांत रस्त्यांची काहीशी विचित्र स्थिती निर्माण झाली आहे. २०० ते १५० मीटरच्या डांबरी रस्त्यावर मध्येच अर्धवट कुठेतरी सिमेंट कॉंक्रीटचा ५० मीटरचा रस्ता तयार करून ठेवण्यात आला. या रस्त्याचे उतारही (रॅम्प) व्यवस्थित नाहीत. त्यामुळे अशा धोकादायक रस्त्यावर वाहन चढवताना आणि त्यावरून उतरताना नागरिकांना



प्रचंड मन:स्ताप सहन करावा लागत आहे. वाहन वर चढवताना किंवा उतरवताना वाहनासह शरीराला जोरात धक्का बसतो. बरेचदा वाहनावरून नियंत्रण सुटून वाहन खाली पडण्याचे प्रकार घडत आहेत. यामुळे शहरातील अनेक नागरिकांना दुखापती झाल्या आहेत.शहरातील जुना भाग, पन्नालाल नगर, गुरुकृपा कॉलनी तसेच नवीन भागात असे अर्धवट रस्ते तयार झाले आहेत. निधी आला की उर्वरित रस्ता पूर्ण करू, असे सांगून नागरिकांची बोळवण केली जात आहे. परंतु, मनपाकडे निधीची चणचण असल्यामुळे हा रस्ता केव्हा पूर्ण होईल ते काही सांगता येत नाही. मनपा सध्या मोजक्याच डांबरी रस्त्यांना मंजुरी देत आहे.

# उपअभियंता डॉ. प्रमोद इंगोले यांना ‘इमिनेन्ट इंजिनिअर अवार्ड’ प्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–** दि इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनियर्स (इंडिया) अमरावती लोकल सेंटर व इंडियन वॉटर वर्क असोसिएशन अमरावती सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने ५८ वा अभियंता दिन दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात आला. भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात महानगरपालिका उपअभियंता प्रमोद विठ्ठलराव इंगोले यांना त्यांच्या सेवाकाळातील उल्लेखनीय व उत्कृष्ठ कार्याबद्दल इमिनेन्ट इंजिनिअर अवार्ड प्रदान करण्यात आला.

यावेळी शासकीय तंत्रनिकेतन, अमरावतीचे प्राचार्य अभियंता डॉ. अतुल बोराडे यांच्या हस्ते प्रमोद इंगोले यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक प्रवासापासून ते अमरावती महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता व प्रभारी उपअभियंता म्हणून केलेल्या कार्याची विशेष




दखल घेण्यात आली.

शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी रस्ते विकास योजना, अतिक्रमण निर्मूलन, उड्डाणपूलावरील अपघात प्रतिबंधक उपाययोजना, सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत रस्ते व नाले विकास, कोविड काळातील बचावात्मक कार्य, छत्रीतलाव सौंदर्यीकरण, विविध महत्वाचे रस्ते व पायाभूत सुविधा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करण्यामध्ये त्यांनी मोलाची कामगिरी बजावली.

या कार्याची दखल घेत संस्था व सहकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांना इमिनेन्ट इंजिनिअर अवार्ड देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी महानगरपालिकेतील अधिकारी व सहकारी यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी मा.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्यासह अधिका-यांनी उपअभियंता प्रमोद इंगोले यांचे अभिनंदन केले.

# जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत तक्षशिला कॉलेजचा विद्यार्थी विजयी

## विभागीय कुस्ती (ग्रीको रोमन) स्पर्धेसाठी निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती** जिल्हास्तरीय शालेय कुस्ती (ग्रीको रोमन) स्पर्धेत तक्षशिला कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी प्रेमकुमार संतोष बुंदेले विजयी ठरला आहे. विभागीय क्रीडा संकुलाच्या प्रांगणात १९ वर्ष वयोगटातील कुस्ती (ग्रीको रोमन) स्पर्धेत तक्षशिला कनिष्ठ महाविद्यालयातील प्रेमकुमार संतोष बुंदेले यांने सुवर्ण पदक प्राप्त केले




आहे.जिल्हास्तरीय स्पर्धेत विजयी झाल्यानंतर त्याची विभागीय शालेय कुस्ती (ग्रीको रोमन) स्पर्धेकरिता निवड झाली आहे. प्रा.एस.ए. कुमरे यांच्या मार्गदर्शनात तक्षशिला महाविद्यालयाच्या प्रेमकुमार बुंदेले यांने हे यश प्राप्त केले आहे. या यशाबद्दल श्री दादासाहेब गवई चारिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष कीर्ती अर्जुन, संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस, प्रशासकीय अधिकारी प्रा.सचिन पंडित, तक्षशिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधुरी फुले, उपप्राचार्य प्रा. प्रितेश पाटील यांच्यासह प्रा. एम बी पाटील, डॉ. आर एस बेलसरे, डॉ. आनंद देशमुख, प्रा.एन जी. भोरे, डॉ. प्रवीण वानखडे तसेच महाविद्यालयातीलइतर प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रेमकुमार संतोष बुंदेले यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.-

# मध्यप्रदेशमधून बेकायदेशीर दारू विक्री करणाऱ्या हॉटेलवर जिल्हाधिकाऱ्यांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ अमरावती,** अमरावतीतील रीच गार्डन हॉटेलमध्ये मध्यप्रदेश राज्यात विक्रीस असलेली परराज्यातील दारू बेकायदेशीरपणे विक्रीस ठेवल्याची माहिती मिळाल्यानंतर या ठिकाणी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठी कारवाई करण्यात आली.राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या तपासणीत मध्यप्रदेशातील विविध ब्रँडची २९२ बॉटल्स सापडल्या. यामध्ये १ हजार मिली, ७५० मिली, ३७५ मिली व १८० मिली क्षमतेच्या बॉटल्सचा समावेश आहे. सदर दारूची एकूण किंमत सुमारे १ लाख १७ हजार इतकी आहे. अनुज्ञप्तीधारक राज सुनील शाहू तसेच हॉटेलचे व्यवस्थापक निखिल अनिल शाहू यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर हॉटेलमध्ये परराज्यातून आणलेली दारू बेकायदेशीररित्या विक्रीस ठेवण्यात आली होती. ही दारू ग्राहकांना विक्री करण्यासाठी सज्ज स्थितीत होती. यामुळे संबंधित अनुज्ञप्ती कायमस्वरूपी रद्द करण्यात आली .तसेच अमरावती येथील हॉटेल आर. के. रेस्टॉरेंट ॲण्ड बार, बायपास बडनेरा रोड येथेही कारवाई करण्यात आली. येथील मद्य भेसळयुक्त तसेच कमी तीव्रतेचे असल्याचे नमुन्याच्या तपासणीअंती आढळून आले. अनुज्ञप्तीधारक राजकुमार छतुमल रतणानी यांची जिल्हाधिकारी यांच्या समक्ष सुनावणी घेण्यात आली.जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, शासन महसुलाचे नुकसान होते तसेच जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे निरीक्षण नोंदवून सदर अनुज्ञप्ती एक महिन्यासाठी रद्द करण्यात आली.

# अमरावती येथे ८ व ९ नोव्हेंबर रोजी डॉ. स्वामी परमार्थदेवजी यांचा इंटीग्रेटेड योग प्राणायाम शिबीर आणि योग महासंमेलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

परम पूज्य योगऋषी स्वामी रामदेवजी महाराज यांच्या आशीर्वादाने, गेली २० वर्षे आम्ही योगप्रसारासाठी कार्यरत आहोत. स्वामीजींचा पहिला योगशिबीर क्तझच् च्या प्रांगणात झाला होता, आणि त्याच माध्यमातून आम्हाला योग कार्याशी जोडले गेले. आज योगाने शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक लाभ देत प्रत्येक घरात आपले स्थान निर्माण केले आहे.या दृष्टीने पतंजलीच्या विविध लोककल्याणकारी उपक्रमांद्वारे देशात आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर योग प्रसाराचे कार्य केले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून ८ व ९ नोव्हेंबर २०२५ रोजी अमरावती येथे डॉ. स्वामी परमार्थदेवजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य इंटीग्रेटेड योग प्राणायाम शिबीर व योग महासंमेलन आयोजित करण्यात येत आहे.या महासंमेलनाच्या नियोजनासाठी आयोजित बैठक रुद्रेश मंगलम, नवाथे, अमरावती येथे पार पडली. या बैठकीचे मुख्य संयोजक आदरणीय चंद्रकुमारजी लक्ष्मी भैया जाजोदिया, तर मुख्य मार्गदर्शक प्रांत प्रभारी दिनेन्द्रजी राठोड, अनिलजी अमृतवार, प्रदीपजी काटेकर, तसेच जिल्हा संरक्षक अशोकजी मूंदडा व इतर प्रांतीय सदस्य उपस्थित होते.



भारत स्वाभिमानचे जिल्हा प्रभारी योगेश राठी आणि त्यांची कार्यसमिती, तालुका समित्या, कार्यकर्ते, योगसाधक आणि योगप्रेमींनी या योगयज्ञास यशस्वी करण्यासाठी पूर्ण सहकार्य देण्याचे ठरवले.या भव्य आयोजनामध्ये योगऋषी स्वामी रामदेवजी महाराज यांचे येण्याची शक्यता आहे, आणि ते स्वतः महासंमेलनात मार्गदर्शन करणार असल्याचेही सूचित करण्यात आले.योग शिबीर श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर, रोज सकाळी ५:३० ते ७:४५ या वेळेत होईल. यात प्राणायाम, योगासने, ध्यान यांचा समावेश असेल. यामध्ये इझ, शुगर, थायरॉईड, आर्थरायटिस, कॅन्सर अशा आजारांवर योग व आयुर्वेदाच्या माध्यमातून उपचारपद्धती सांगण्यात येतील.या संमेलनात प्रमुख उपस्थती चंद्रकुमारजी जाजोदिया, कमलकिशोरजी मालाणी, प्रशांतजी पनपालिया, नंदकिशोरजी तु. राठी यांची राहणार आहे.

# नागरवाडीचे बापूसाहेब देशमुख यांनी विद्यार्थ्यांना दिला शिकण्याचा मंत्र

## रत्नाबाई राठी हायस्कूलमध्ये शालेय साहित्याचे वाटप; गाडगेबाबांच्या विचारांचे प्रेरणादायी दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७दर्यापूर**

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित रत्नाबाई राठी हायस्कूल, दर्यापूर येथे संत गाडगेबाबा संस्था, नागरवाडी यांच्या वतीने, तसेच श्री नितीन दळवी (मुंबई) यांच्या सौजन्याने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.



या प्रसंगी संत गाडगेबाबा संस्था, नागरवाडीचे मार्गदर्शक तथा मुंबई येथील गाडगे महाराज विषय समितीचे उपाध्यक्ष श्री बापूसाहेब देशमुख, संचालक श्री सागर देशमुख, तसेच शाळेतील शिक्षक श्री गावंडे, श्री अतुल रेडे, व अन्य शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, चॉकलेट आणि बिस्किटांचे वाटप केले.

कार्यक्रमाला दर्यापूर येथील सामाजिक कार्यकर्ते श्री गजाननराव देशमुख यांनीही उपस्थिती लावली.या निमित्ताने शाळेचे मुख्याध्यापक श्री हेमंत रेचे व शिक्षक प्रतिनिधी श्री विलास मुळे यांनी श्री बापूसाहेब देशमुख यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला.आपल्या प्रेरणादायी भाषणात बापूसाहेब देशमुख यांनी विद्यार्थ्यांना संत गाडगेबाबांच्या समाजसेवेचे महत्त्व समजावले आणि शिकण्याचा कानमंत्र दिला. त्यांच्या उद्बोधक शब्दांनी विद्यार्थ्यांमध्ये नवी उमेद आणि प्रेरणा जागवली.श्री अतुल रेडे सर यांनी गाडगेबाबांचे सुंदर भजन सादर करून वातावरण भक्तिमय केले.या कार्यक्रमात शाळेतील शिक्षक श्री मेश्राम, श्री पिसे, श्री पचारे, श्री हागोणे, श्रीमती ताथोड, श्रीमती दागटे, श्रीमती रोकडे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सांगता गाडगेबाबांच्या भजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन विज्ञान शिक्षक राहुल महाजन सर यांनी केले.

# काउचपफी फर्निचर्सच्या 'अभी नहीं तो कभी नहीं' सेलला अमरावतीत उत्स्फूर्त प्रतिसाद






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

अमरावतीतील प्रसिद्ध प्रीमियम फर्निचर आणि गिफ्ट मॉल काउचपफी फर्निचर्स, ड्रीमलँड यांनी ग्राहकांसाठी विशेष अभी नहीं तो कभी नहीं सेल सुरू केला आहे. या सेलमध्ये आकर्षक आणि दिलखुलास ऑफर्स देण्यात येत असून, फर्निचर खरेदीवर विविध महागडी उत्पादने मोफत मिळत आहेत.

या सेलअंतर्गत, २५ हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीचे सोफा, डायनिंग टेबल किंवा बेडरूम सेट खरेदी केल्यास २५ हजार रुपयांचा रिक्लायनर अगदी मोफत दिला जात आहे. तसेच, सेंटर टेबल, बेड किंवा वार्डरोब खरेदीवर ५ हजार रुपयांची ऑफिस चेअरही मोफत मिळत आहे.

ग्राहकांच्या वाढत्या मागणीला प्रतिसाद देत, ड्रीमलँडने १०,००० चौरस फूट क्षेत्रात एक खास एक्सक्लुझिव्ह ऑफिस फर्निचर शोरूम सुरू केले आहे. येथे चेअर, गेमिंग चेअर, व्हिजिटर चेअर, ऑफिस टेबल, कॉन्फरन्स टेबल, वेटिंग लाउंज चेअर आणि एअरपोर्ट सोफा अशा सर्व ऑफिस फर्निचर प्रकारांची उपलब्धता आहे. यामध्ये ९ व्हिजिटर चेअर खरेदी करा आणि १ मोफत मिळवा अशी खास ऑफर लागू आहे.

याशिवाय, काउचपफी फर्निचर्सने आता एक प्रीमियम गिफ्ट आर्टिफॅक्ट्स गॅलरीदेखील सुरू केली आहे. येथे भगवानांच्या मूर्ती, प्राचीन व आधुनिक कला, घड्याळे, कुंड्या, पितळी वस्तू आणि लाकडी गिफ्ट आर्टिकल्स यांचा समावेश आहे. विशेष ऑफरनुसार, १४,९९० रुपयांचे गिफ्ट आर्टिफॅक्ट्स खरेदी केल्यास तब्बल ५५ हजार रुपये किमतीची ऑफिस चेअर मोफत दिली जात आहे.ग्राहकांसाठी बजाज ईझी फायनान्सची सुविधा देखील उपलब्ध आहे. काउचपफी फर्निचर्सचे संचालक अनिलकुमार अग्रवाल यांनी अमरावतीकरांना आवाहन केले आहे की त्यांनी शोरूमला भेट देऊन या अप्रतिम आणि मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध असलेल्या ऑफर्सचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

# पकोडे तळून युवक काँग्रेसचे अनोखे आंदोलन रोजगारासाठी मोदी सरकारविरोधात घोषणाबाजी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

युवक काँग्रेसच्या वतीने आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त अनोख्या पद्धतीने आंदोलन करण्यात आले. स्थानिक पंचवटी चौकात पकोडे तळून सरकारच्या रोजगार धोरणांचा निषेध करण्यात आला. या आंदोलनाचे नेतृत्व वैभव वानखडे यांनी केले.

युवकांनी हातात डिग्री घेऊन पकोडेवाले पीएम धन्यवाद! अशा घोषणा देत रोजगाराच्या मागणीसाठी आवाज उठवला. अनेकांनी शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याची खंत व्यक्त केली. आंदोलनात सहभागी युवकांनी केंद्र सरकारच्या रोजगाराच्या अपयशी धोरणांवर कठोर टीका केली.यावेळी मोठ्या संख्येने युवकांची उपस्थिती होती आणि त्यांनी शांततापूर्ण मार्गाने आपला रोष व्यक्त केला.या आंदोलनात अमरावती विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख, शहरजिल्हा उपाध्यक्ष नितीन काळे, जिल्हा उपाध्यक्ष अक्षय साबळे, निखिल बिजवे, शिवानी पारधी, एड.अफरोज खान, एनएसयुआय शहराध्यक्ष संकेत साहू, सौरभ तायडे, चैतन्य गायकवाड, धनंजय बोबडे, सुजल इंगळे, साहिल वानरे ,निशांत पवार, सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रसंत रुपलाल महाराज स्मारकाचे दिवाळी पूर्वी भूमिपूजन करा

## बारी समाजाचे मुख्यमंत्र्यांना तहसिलदार मार्फत निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अंजनगाव सुर्जी**

समस्त बारी समाजाचे दैवत राष्ट्रसंत संत रूपलाल महाराज यांचे राष्ट्रीय स्मारक अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथे मंजुर होऊन एक वर्ष होत आहे, परंतु काही प्रशासकीय निधी तरतुदीच्या अनुषंगाने स्मारकाचे काम संथगतीने सुरु आहेह्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश मा. जिल्हाधिकारी अमरावती यांना दिलेले होते त्यानूसार जिल्हाधिकारी अमरावती व संभंधित विभागाने दि. २३/०१/२०२५ रोजी महासंघाची व समाजबांधवांचे उपस्थितीतआराखडा बैठक घेवून स्मारकाचा प्रस्ताव प्रशासकिय मंजुरीसाठी व आर्थिक तरतुदीसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठविला होतातसेच बारी समाजाच्या आर्थीक उन्नतीसाठी संत रूपलाल महाराज आर्थीक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. तथापी संचालक मंडळाची नेमणुक प्रलंबित आहे.सदरच्या चांगल्या कामाबद्धलसंपुर्ण बारी समाजाच्या



वतीने बारी महासंघाकडून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली . बारी समाजाच्या दोन्ही मागण्या शासनाने त्वरित मंजुर केल्याने देशातील समस्त बारी समाज सदैव ऋणी आहेसदरच्या श्री संत रूपलाल महाराज राष्ट्रीय स्मारकाचे भूमीपूजन हे राज्याचे मुख्यमंत्री द्वेंद्रजी फडणवीस, व दोन्ही उपमुख्यमंत्री ह्यांचे शुभहस्ते येत्या दिवाळीपुर्वी व्हावे अश्या विनंतीचे पत्रतसेच आर्थीक विकास महामंडळाचे कामकाज तत्पर सुरू व्हावे व त्यावर बारी समाजाचे संचालक मंडळाची नेमणुक व्हावी ह्यासाठी समाज बांधवांची एक बैठक तत्पर लावून समाजाचा जिव्हाळ्याचा विषय मार्गी लावावा अश्या विनंतीचे पत्र तहसीलदार पुष्पा सोळंके ह्यांचे मार्फत मुख्यमंत्री द्वेंद्रजी फडणवीस ह्यांचे कडे केली असून सदरची विनंती पत्राची मोहीम हीं संपूर्ण महाराष्ट्रातून होत आहेह्याप्रसंगी निवेदन देतांना प्रसिद्धी प्रमुख मनोहर मुरकुटे, ,उमेश भोंडे, संजय नाठे, निलेश ढगे, देवीदासजी गुजर,महेंद्र धुळे, नितीन दातीर, दिलीप अस्वार, रमेश धुळे, संजय टिपरे, गोपाल नाठे, गजानन धुळे, रोहित मुरकुटे,सुनील माकोडे सुधाकर टिपरे, विक्रम सातपुते, मंगेश पाटील,राजेश अस्वार, नितीन दातीर,वसंत कपले विनोद पाटील,देविदासजी गुजर,सुमित भावे, अनुप भावे इ समाजबांधव ह्यावेळी उपस्थित होते

# छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानांतर्गत तळेगाव ठाकूर ग्रामपंचायतीत सेवा पंधरवडा उत्साहात सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७तळेगाव ठाकूर**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात येणाऱ्या सेवा पंधरवडा उपक्रमाची उत्साहपूर्ण सुरुवात तळेगाव ठाकूर ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी ९.०० वाजता पार पडलेल्या उद्घाटन सोहळ्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचाही शुभारंभ करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री महोदयांचे संभाषण थेट प्रक्षेपणाद्वारे ग्रामस्थांना दाखवण्यात आले.सेवा पंधरवड्यात तीन टप्प्यांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात गावातील पाणंद रस्त्यांची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. सर्व रस्त्यांची यादी तयार करून ती ग्रामसभेत सादर करण्यात आली. अतिक्रमित रस्त्यांचे सीमांकन भूमी अभिलेख विभागाकडून कोणतेही शुल्क न आकारता करण्यात येणार आहे. तसेच सर्व रस्त्यांना स्वतंत्र क्रमांक देऊन गावदप्तरात त्यांच्या नोंदी घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भविष्यातील रस्ते विकासाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे ग्रामसभेत स्पष्ट करण्यात आले.

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांचे अमरावती रेल्वे स्थानकावर जल्लोषात स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन सकपाळ आज अमरावती रेल्वे स्थानकावर आगमन झाल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, प्रदेश सरचिटणीस हरिभाऊ मोहोड यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागत केले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, घोषणाबाजी करून आणि ढोल-ताशांच्या गजरात सकपाळ यांचे जोरदार स्वागत केले.सकपाळ यांच्या आगमनानंतर पुढील संघटनात्मक बैठका आणि पक्षाच्या कार्याचा आढावा जिल्हा काँग्रेस भवन श्यामनगर या ठिकाणी घेण्यात येणार आहे. यावेळी स्थानिक काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त नांदगाव खंडेश्वर आयटीआयतर्फे स्वच्छता अभियान

## खंडेश्वर मंदिर व येनस परिसरात केले श्रमदान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नांदगाव खंडेश्वर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांना देशभरात प्रारंभ करण्यात आला असून त्याचाच एक भाग म्हणून एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदगाव खंडेश्वर (आयटीआय) तर्फे बुधवारी (ता. १७) स्वच्छ भारत अभियानांतर्गत श्रमदानाचे आयोजन प्रभारी प्राचार्य सुरेश मेंढे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

शहरातील खंडेश्वर मंदिर व येनस परिसरात हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात संस्थेचे प्रशिक्षणार्थी, कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. परिसरातील कचरा, गवत व प्लास्टिक गोळा करून स्वच्छता करण्यात आली. मंदिर परिसराला स्वच्छ व देखणे ठेवण्याचा संकल्प यावेळी विद्यार्थ्यांनी केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होऊन समाजात स्वच्छतेचा संदेश पोहोचला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता आयटीआयचे शिल्पनिदेशक राजेंद्र उन्होंणे, राजकुमार धोटे, तुषार जैन, प्रफुल्ल कचरे, वैभव जाधव, निलेश देऊळकर, राम इखार, शहजाद खान, सुशिल सरोदे, सागर डांगे, चिन्मय दहाट, वैभव केणे, प्रशांत पोच्ची, सचिन वाहणे, सचिन दुवदने, मयुरी वसुले, रूचिका डोरस, संगिता बिबेकर, दिपाली लोखंडे, रूपाली लांडे, सुरक्षारक्षक धिरज तायडे यांच्यासह प्रशिक्षणार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# संस्थात्मक सुशासन व नेतृत्व विकासाची आज गरज - कुलगुरू डॉ. बारहाते

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागाच्या वतीने, यूजीसी–मालवीय मिशन टिचर ट्रेनिंग सेंटर व महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट अकॅडमी, पुणे यांच्या सहकार्याने आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते १६ सप्टेंबर रोजी झाले.



'इन्स्टिट्युशनल गव्हर्नन्स अँड लिडरशीप: बिल्डिंग फ्युचर–रेडी मॅनेजर्स' या थिमवर आधारित ही कार्यशाळा १९ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरूंनी संस्थात्मक सुशासन व नेतृत्व विकासाची गरज अधोरेखित करत, उच्च शिक्षण संस्था ही नेतृत्व घडविण्याची प्रयोगशाळा असल्याचे सांगितले.कार्यशाळेचे समन्वयक डॉ. दीपक चाचरकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मुक्ता मंत्री यांनी आभार मानले, तर सूत्रसंचालन प्रणिता गिरी हिने केले. कार्यशाळेत प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी सहभागी झाले असून, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत होण्यास आणि जागतिक व्यवस्थापन ट्रेंड्स समजून घेण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# प्रधानमंत्री युगपुरुष, त्यांनी शंभर वर्षापर्यंत भारताचे नेतृत्व करावे

## खा.डॉ.अनिल बोंडे यांचे अंबादेवीला साकड सपत्नीक महाआरती, ७५ दिवे लावले





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामध्ये आध्यात्मिक चेतना, अनुभूती पहायला मिळते. त्यांच्या नेतृत्वात भारत असीम शौर्य गाजवत असून सर्वच क्षेत्रात देश प्रगतीपथावर आहे, त्यांनीच शंभर वर्षापर्यंत देशाचे नेतृत्व करावे, यासंदर्भातील साकडं खासदार डॉ. अनिल बोंडे, डॉ.वसुधा बोंडे यांनी कुलस्वामिनी अंबादेवी आणि एकवीरा देवीच्या चरणी घातलं.

दरम्यान मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांनी सपत्नीक ७५ दिवे लावून पूजाअर्चा आणि आंबादेवी मंदिरात आराधना केली.श्री.शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानच्या पुढाकारातून हे आयोजन करण्यात आलं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा ७५ वा वाढदिवस भाजप तर्फे उत्साहात साजरा करण्यात येत आहे. जिल्हाभरात विविध कार्यक्रमांचा आयोजन करण्यात आलं होतं. त्याच क्रमात श्री. शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानच्या पुढाकारातून बुधवारी (ता.१७) खासदार डॉ. अनिल बोंडे, डॉ. वसुधा बोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कुलस्वामिनी अंबादेवी आणि एकवीरा देवीच्या मंदिरात पहाटेच्या प्रहरात महाआरतीच आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी डॉ.अनिल बोंडे, डॉ.वसुधा बोंडे यांनी अंबा देवीच्या मंदिरात पूजा अर्चा महाआरती केली. प्रधानमंत्री यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांनी मंदिरात ७५ दिवे लावले. दरम्यान बोलताना डॉ.अनिल बोंडे म्हणाले, विकसित भारत निर्माण करणाऱ्या नेत्याचा आज वाढदिवस आहे. त्यांच्याकडे आध्यात्मिक चेतना, अनुभूती असल्यामुळे त्यांनीच शंभर वर्षापर्यंत भारताचे नेतृत्व करावं. गोली का उत्तर गोले से देणाऱ्या या नेतृत्वाला अंबाबाई निरोगी आयुष्य देवो, अशी प्रार्थना देखील त्यांनी यावेळी केली. भाजपा शहराध्यक्ष नितीन धांडे, दिनेश सूर्यवंशी, डॉ.संगीता शिंदे, ऍड प्रशांत देशपांडे, मीनाताई पाठक, निशान जोध, कर्ण धोटे, महामंत्री बादल कुलकर्णी, चेतन पवार, ड राजेंद्र पांडे, नकुल सोनटक्के, रघुनाथ खलोकार, माला डोईफोडे, विवेक गुल्हाने, अजय सारसकर, ललित समदुरकर, दिनेश शर्मा, हरीश नाडे, आशीष सुंठवाल, शुभम कामनापुरे, दीपक यलगलंवार, आदित्य धनवटे, विकास मरोडकर, कवी ठाकूर, यश सगने, जितेश किल्लेकर, तपेश हंबर्डे, तेजस भुजाडे, प्रज्वल खापरे, चैतन्य उपाध्याय, धवल पोपट,अनुप सावरकर, तेजस पोहेकर, अतुल वाकोडे, आकाश यादव, आकाश चिखलकर, अभिजित तायडे यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी मोठ्यासंख्येने उपस्थिती होते.

# अमरावतीहून मुंबईला आता सकाळी विमान 'एमएडीसी'कडून वेळापत्रकात बदल

## सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवार असे एकूण चार दिवस




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

अमरावतीहून मुंबईसाठी सुरू झालेल्या प्रवासी विमानसेवेच्या वेळांबाबत प्रवाशांमध्ये असलेली नाराजी अखेर दूर झाली आहे. प्रवाशांच्या मागणीचा विचार करून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने (एमएडीसी) हिवाळी वेळापत्रकात महत्त्वपूर्ण बदल केले असून, येत्या २६ ऑक्टोबरपासून अमरावतीहून मुंबईला जाणारे विमान आता सकाळी ९.१५ वाजता उड्डाण घेणार आहे. तसेच, आठवड्यातून चार दिवस ही सेवा उपलब्ध होणार आहे.

ही विमानसेवा सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवार असे एकूण चार दिवस सुरू राहणार आहे.

मुंबईहून अमरावतीकडे (उड्डाण क्रमांक ९/६३३): वेळ: सकाळी ७:०५ वाजता मुंबईहून निघेल आणि सकाळी ८:५० वाजता अमरावतीला पोहोचेल. अमरावतीहून मुंबईकडे (उड्डाण क्रमांक ९ / ६३४): वेळ: सकाळी ९:१५ वाजता अमरावतीहून निघेल आणि सकाळी ११:०० वाजता मुंबईला पोहोचेल.

सध्या अमरावती ते मुंबई अशी अलायन्स एअर कंपनीची विमानसेवा सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या दिवशी उपलब्ध आहे. मात्र, सध्याच्या वेळापत्रकानुसार मुंबईहून दुपारी ३.२५ वाजता सुटणारे विमान अमरावतीच्या बेलोरा विमानतळावर सायंकाळी ५.१० वाजता पोहोचते. त्यानंतर सायंकाळी ५.३५ वाजता ते मुंबईसाठी पुन्हा उड्डाण घेते आणि रात्री ७.२० वाजता मुंबईत पोहोचते. या वेळांमुळे प्रवाशांना दिवसभराची कामे करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याने ही सेवा सोयीची नसल्याची तक्रार होती. यामुळेच मुंबईला जाणारे विमान सकाळच्या वेळी असावे, अशी मागणी अमरावतीकरांकडून होत होती.

'एमएडीसी'ने आता ही मागणी मान्य करत २६ ऑक्टोबर ते २८ मार्च २०२६ या कालावधीसाठी नवीन वेळापत्रक जाहीर केले आहे. या नव्या वेळापत्रकामुळे व्यवसाय, उद्योग, वैद्यकीय सेवा, शिक्षण आणि पर्यटन या क्षेत्रांतील प्रवाशांसाठी मोठे फायदे अपेक्षित आहेत.मुंबई मधील कामे आटोपून त्याच दिवशी रात्रीने रेल्वे प्रवास केल्यास, दुसऱ्या दिवशी सकाळी अमरावतीत परत येणे शक्य होणार आहे. यामुळे २४ तासांत अमरावतीहून मुंबईला जाऊन परत येणे शक्य होणार आहे. तसेच, सकाळी मुंबईतून अमरावतीत येणाऱ्या प्रवाशांनाही ही विमानसेवा सोयीची ठरेल, कारण सकाळी मुंबईहून अमरावतीकडे परतण्यासाठी कमी रेल्वेगाड्या उपलब्ध आहेत.एमएडीसीच्या उपाध्यक्षा आणि व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे म्हणाल्या की, या नवीन वेळापत्रकामुळे अमरावतीकर नागरिकांची अनेक दिवसांची मागणी पूर्ण झाली आहे. या नव्या सेवेमुळे हवाई वाहतूक पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होईल आणि अमरावतीचा विकास होण्यास मदत होईल.

# विद्यार्थ्यांची बसमध्ये अक्षरशः कोंबून वाहतूक - प्रशासनाचे लक्ष कधी जाणार?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ तिवसा**

तिवसा - नागपूर-अमरावती महामार्गावर दररोज सकाळच्या वेळेस तिवसा ते अमरावती दरम्यान धावणाऱ्या एसटी बसमध्ये प्रचंड गर्दी पाहायला मिळते. विद्यार्थ्यांपासून सर्वसामान्य प्रवाशांपर्यंत सर्वजण अक्षरशः कोंबून प्रवास करत आहेत. एकाच बसमध्ये जागा अपुरी असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना एका पायावर उभं राहून प्रवास करावा लागत आहे.सकाळी साडेसहा वाजता निघणारी ही पहिली आणि एकमेव बस तिवसा, मोझरी, शेंदोळा, शिवणगाव, सावर्डी, पिंपळविहीर आणि नांदगाव पेठ मार्गे अमरावतीला पोहोचते. बसमधील जागेअभावी अनेक विद्यार्थ्यांना वेळेत त्यांच्या शाळा व महाविद्यालयांमध्ये पोहोचणे शक्य होत नाही. परिणामी त्यांच्या अभ्यासावर व भविष्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विद्यार्थी आणि पालकांची मागणी सकाळच्या वेळेस तिवसा-अमरावती मार्गावर बससेवा वाढवावी! स्थानिक प्रशासन व एसटी विभागाने या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देण्याची गरज आहे.

# सत्तेच्या खिशात सत्ता लोकशाहीचा अपमान

## हर्षवर्धन सपकाळांचा फडणवीसांवर घणाघात




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना केंद्र आणि राज्यातील भाजप सरकारवर जोरदार टीका केली.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका २०२२ पासून न घेण्यामागे एका ठरवलेल्या कारस्थानाचा भाग असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. देवेंद्र फडणवीस यांना त्यांच्या जॅकेटच्या खिशात सत्ता पाहिजे आहे, सर्व सत्ता एकाच माणसाकडे असावी, ही त्यांची मानसिकता आहे, असा घणाघात त्यांनी केला.

ते पुढे म्हणाले की, सुप्रीम कोर्टाचा नुकताच आलेला निकाल हा फडणवीसांना दिलेला थेट चपराक आहे. भाजपच्या सत्ताकेंद्री धोरणामुळे लोकशाही संस्थांचा गळा घोटला जातोय, आणि यामध्ये नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस यांचं केंद्रीयृत राजकारण जबाबदार असल्याचे ते यावेळी म्हणालेत.

सपकाळ यांनी भाजपमधील अंतर्गत संघर्षावरही बोट ठेवलं. महाराष्ट्रात जाहिरात वार सुरू आहे. मोहित कंबोज यांचा नवीन सेट फडणवीसांकडून लॉन्च होत आहे. शिवाजी महाराजांची नमतस्तक जाहिरात नको त्या ठिकाणी लावून विटंबना केली जातेय, असा आरोप त्यांनी केला.

याला उत्तर म्हणून एकनाथ शिंदे यांनी नरेंद्र मोदींच्या जाहिरातीतून आपली सत्ता दाखवण्याचा प्रयत्न केलाय, असेही सपकाळ म्हणाले.

नरेंद्र मोदींच्या वाढदिवसानिमित्त सपकाळ यांनी शुभेच्छा देतानाही उपरोधिक टोले लगावले. नाल्याच्या गॅसमधून चहा, डिजिटल कॅमेराने फोटो, स्टेशन नसताना चहा विक्री - असे अनेक 'चमत्कार' नरेंद्र मोदी यांच्या नावावर आहेत.प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख, दरवर्षी २ कोटी नोकऱ्या देण्याचं आश्वासन कुठे गेलं? बेरोजगारी, शेतकऱ्यांची कर्जमाफी नाही हे वास्तव मोदींनी स्वीकारावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

बोले तैसा चाले... पण मोदी उलट चाललेअशा शब्दांत सपकाळ यांनी आजच्या संवादात केंद्र सरकारवर सडेतोड प्रहार करत भाजपच्या आश्वासनांचा पोकळपणा उघड केला.

# मेळघाटच्या पर्यटकांना राईड सेफ , सेव्ह द लाईफ ,सेव्ह द ट्री संदर्भात जनजागृती

## सोव्हेरियन रायडर्स,सोलापूर च्या ग्रुपचा अमरावतीत उपक्रम : ४० सदस्यीय टीम शहरात दाखल : उद्या पासून मेळघाटातील पर्यटन स्थळांना भेटी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

देशभरातील पर्यटन स्थळांना भेट देत पर्यटकांमध्ये सेफ राईड च्या माध्यमातून सेव द लाईफ ,सेव द ट्री यासह विविध सामाजिक जनजागृती करणाऱ्या सोलापूरच्या सोव्हेरीयन ग्रुपने मेळघाटात जनजागृती करण्याचा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला असून बुधवारी सायंकाळी टीमचे तब्बल ४० सदस्य अमरावतीमधे दाखल झाले असून उद्या गुरुवारी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथील विद्यार्थ्यां सोबत संवाद साधुन वृक्षारोपणासह हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे कार्याविषयी माहिती घेऊन हा ग्रुप मेळघाटला रवाना होईल, याबाबत विहिंप चे माजी जिल्हाध्यक्ष तसेच वनबंधु परिषदे अमरावती चाप्टरचे आरोग्य समिती प्रमुख डॉक्टर अरुण मोंढे यांनी माहिती दिली .

सोलापूर येथील या ग्रुपचा उद्देश पर्यटनाचा आनंद घ्या, पण जीवन सुरक्षित ठेवून कायमस्वरूपी आनंद घ्या हा संदेश पर्यटकांपर्यंत पोहोचवणे आहे.या माध्यमातून पर्यटकांना वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन करणे , हेल्मेट वापरण्याचे फायदे , दारू पिऊन वाहन चालवू नये, तसेच प्लास्टिक पासून होणारे निसर्गाचे नुकसान आणि वन्य जीवांच्या अधिवासातील मानवी हस्तक्षेपासह अतिक्रमण टाळण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. अलीकडील वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर याची विशेष जाणीव करून दिली जाणार आहे.याशिवाय वृक्षलागवडीचे महत्त्व अधोरेखित करण्यात येणार असुन याकरिता बुधवारी १७ सप्टेंबरला ४० सदस्यीय टीम शहरात दाखल झाली असून आज हव्याप्र मंडळाला सकाळी सात वाजता भेट देऊन तेथील विद्यार्थ्यां सोबत संवाद साधणार आहेत त्यानंतर ते चिखलदऱ्याकरता रवाना होतील . या उपक्रमात सोव्हेरियन रायडर्सचे अध्यक्ष पवन मोंढे , उपाध्यक्ष राहुल मोकाशी, सचिव सचिन जोशी, खजिनदार वैभव होमकर यांच्या नेतृत्वाखाली प्रविण कांबळे, आनंद पाटील, आशुतोष पाटील , महेश पाटील, भाग्यवन्त तरंगे, प्रसाद कुलकर्णी , शेखर कसायेगावकर आदींचा सहभाग आहे, सायंकाळी ५ ते रात्री ८ दरम्यान मेळघाटातील दुर्गम ग्राम जामली येथे वनबंधु परिषद संचालित अभियान *एकल विद्यालय* भेट, आदिवासी बांधवांशी संवाद व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन. रात्री ८ वा. राजाकोठी रिसॉर्ट येथे वनवासी जनसामान्यासह चर्चा करून आदिवासी परंपराची माहिती घेऊन आदिवासी गादली नृत्याचा आनंद घेणार आहेत.

१९ सप्टेंबरला चिखलदरा, गाविलगड, कोलकास, ढाकणा, नरनाळा इत्यादी पर्यटनस्थळांना भेट देऊन तेथील पर्यटकांशी संवाद साधून जनजागृती केली जाणार आहे, मेघाटातील या राइट्स चे आयोजन विहिंप चे माजी जिल्हाध्यक्ष तसेच वनबंधु परिषद अमरावती चाप्टरचे आरोग्य प्रमुख डॉक्टर अरुण मोंढे , डॉक्टर सुभाष रत्नपारखी, एडवोकेट भोला चव्हाण परतवाडा, शरद कापसे, वनबंधू परिषदेचे सचिव सुमित कलंत्री, रवी माहुलकर परतवाडा यांनी केले आहे ..!

# सेवा पंधरवडा अभियानांतर्गत भाजपा अमरावती शहर आयोजित रक्तदान शिबिरात प्रविण पोटे पाटील यांचे रक्तदान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

भारताचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा अभियानांतर्गत भाजपा अमरावती शहराच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात माजी राज्यमंत्री श्री. प्रविण पोटे पाटील यांनी स्वतः रक्तदान करून समाजाप्रती आपली सामाजिक बांधिलकी जपली.रक्तदान करताना त्यांनी उपस्थित सर्व नागरिकांना रक्तदानाचे महत्त्व पटवून दिले व नियमितपणे रक्तदान करण्याचे आवाहन केले. या उपक्रमास भाजपा शहराध्यक्ष, विविध पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात उत्साहाचे वातावरण दिसून आले आणि अनेकांनी पुढे येत रक्तदान केले.हा उपक्रम समाजातील गरजू रुग्णांसाठी जीवनदायी ठरणारा ठरतोय, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले. भाजपा अमरावती शहराच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# नव्या इलेक्ट्रिक बसेसचा पुरवठा रखडला; प्रवाशांची जुन्या एसटीवरच कसरत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

एसटी महामंडळाच्या ताफ्यात केवळ १५ इलेक्ट्रिक बसेस दाखल झाल्या आहेत. अजूनही उर्वरित बसेच अप्राप्त आहेत. याशिवाय २५ नवीन लालपरी बसची प्रतिक्षा कायम आहे. एकूण मागणीतील अन्य बसेस अद्याप मिळाल्या नाहीत.

दसरा, दिवाळी सण जवळ आला आहे. या सणा दरम्यान प्रवाशांची मोठी गर्दी असते. परंतु बसेसची संख्या मात्र कमी असते. जिल्ह्यात विद्यापीठाजवळ एकमेव इलेक्ट्रिक बसेस चार्जिंग स्टेशन सुरू झाले आहे, मात्र चांदुर बाजार वगळता इतर ठिकाणचे चार्जिंग स्टेशनचे काम अद्याप सुरू झाले नाही. अशातच एसटी महामंडळाने मागणी केलेल्या बसचा पुरवठा परिपूर्ण झालेला नाही. अगोदरच एसटी बसेसची संख्या कमी आहे. सणासुदीच्या दिवसात प्रवाशी वाढतात. मात्र बसेस कमी असल्याने प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागतो. विभागाच्या इलेक्ट्रिक बसेस दाखल झाल्या मात्र मागणीच्या तुलनेत कमी बसेस मिळाल्या आहेत. एसटी महामंडळाने २५१ बसेसची मागणीपैकी आतापर्यंत अमरावती आगाराला १५




इलेक्ट्रिक बसेस दाखल झाल्यात. मात्र, उर्वरित बसेस अद्याप अप्राप्त आहेत. परिणामी अमरावतीचा अपवाद सोडला तर बडनेरा, दर्यापूर, परतवाडा, वरूड, मोर्शी, चांदूर रेल्वे या आगारांना इलेक्ट्रिक बस मिळाल्या नाहीत. ५५ लालपरीची मागणी असताना केवळी २६ बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल झालेल्या आहेत. अद्याप २५ लालपरीची महामंडळाला प्रतीक्षा आहे.

आरामदायी सुविधांसह चालणाऱ्या इलेक्ट्रिक बसमधून विनाचालक प्रवास करण्यासाठी ऑनलाइन तिकीट घेण्याकरिता खिडकीवर रांगा लागल्याचे चित्र बघायला मिळत आहे. महामंडळाच्या महसुलात भर पडत आहे.अमरावती येथील एसटी महामंडळाच्या कार्यशाळेत इलेक्ट्रिक बसेस चार्जिंगसाठी सुरू झाले आहे. मात्र, उर्वरित ७ पैकी चांदूर बाजार अपवाद सोडला तर सहा आगारात इलेक्ट्रिक बस चार्जिंग स्टेशनचे काम सुरू झाले नाही.

> अमरावती विभागात एसटी महामंडळाच्या ताफ्यात १५ इलेक्ट्रिक बसेस दाखल झाल्या आहेत. यासोबतच लालपरी बसेस आल्या आहेत. उर्वरित बसेस दिवाळीपूर्वी अमरावती विभागात प्रवासी सेवेसाठी उपलब्ध होतील.
>
> **नीलेश बेलसरे,**
> **विभाग नियंत्रक**

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सेवा पर्वात महावितरणतर्फे विशेष अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ अमरावती**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस १७ सप्टेंबर ते महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर या कालावधीतील सेवा पर्वात महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणतर्फे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. वीज ग्राहकांनी योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सेवा पर्वातील उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करण्याची सूचना केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वीज ग्राहकांना थेट लाभ मिळवून देणाऱ्या या योजनेला प्राधान्य देण्यास त्यांनी सांगितले आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी सुरू केली आहे. सर्वसामान्य घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी ही योजना आहे. या योजनेमध्ये छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी वीज ग्राहकांना केंद्र सरकारकडून थेट अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला तीस हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला साठ हजार रुपये आणि तीन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला ७८ हजार रुपये अनुदान मिळते.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत